cmyk

## संपादकीय

### ठाम धोरणाचे यश

भूमिका घेणाऱ्या घोषणापत्रावर स्वाक्षरी करण्यास भारताचे संरक्षणमंत्री राजनाथसिंग यांनी स्पष्ट नकार दिला. त्यामुळे अखेर हे घोषणापत्रच बारगळले. या संयुक्त घोषणापत्राविनाच परिषदेची सांगता झाली. भारताच्या ठाम धोरणाचे हे महत्त्वाचे यश आहे. 'सीएसओ' ही संघटना चीनच्या पुढाकाराने स्थापन झाली आहे. भारत या संघटनेचा सदस्य आहे. त्याचप्रमाणे पाकिस्तान, रशिया, इराण, कझाकिस्तान, किरगिस्तान, उझबेकिस्तान आणि ताजिकिस्तान असे ९ देश या संघटनेचे सदस्य आहेत. त्यांच्या संरक्षणमंत्र्यांची ही परिषद होती. कोणत्याही सदस्य देशांना पक्षपाती वागणूक न देण्याचे या संघटनेचे तत्व असले तरी बऱ्याचदा ते कागदावरच राहते.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com


### जगन्नाथ रथयात्रेत ३ हत्ती बिथरले; चेंगराचेंगरीत अनेकजण जखमी

अहमदाबाद : गुजरातमधील अहमदाबादमध्ये जगन्नाथ रथयात्रेत शुक्रवारी (दि. २७) सकाळी थरकाप उडवणारी घटना घडली. रथयात्रेत सहभागी झालेले तीन हत्ती अचानक बिथरले आणि गर्दीतून सैरावैरा धावू लागले. या अनपेक्षित गोंधळामुळे हजारो भाविक जीव वाचवण्यासाठी धावू लागले, यात अनेकजण जखमी झाले. काही वेळ ही भव्य यात्रा भयावह परिस्थितीत बदलली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. शुक्रवारी सकाळी १०.१५ वाजता रथयात्रा शहरातील खाडिया परिसरातून जात असताना ही घटना घडली. रथयात्रेच्या मार्गावर अचानक घडलेल्या या प्रकारामुळे भाविकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले. प्रत्येकजण जीव वाचवण्यासाठी धावत होता.

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–६५ | शनिवार, दि.२८ जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# शक्तिपीठ महामार्गाविरोधात १ जुलैला १२ जिल्ह्यात चक्का जाम

## शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीच्या बैठकीत निर्णय

**पुणे । प्रतिनिधी**

**शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधात महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांतील शेतकरी १ जुलै २०२५ रोजी 'चक्का जाम' आंदोलन करणार आहेत. शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीच्या ऑनलाईन पद्धतीने बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते व माजी खासदार राजू शेट्टी, आमदार सतेज पाटील, खासदार विशाल पाटील यांच्यासह काही शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते.**



### आंदोलनाला सर्वपक्षीय नेत्यांचा पाठिंबा

१ जुलैला होणाऱ्या चक्का जाम आंदोलनात शेतकरी रस्त्यावर उतरून आपला विरोध दर्शवणार आहेत. या आंदोलनाला सर्वपक्षीय नेत्यांचा पाठिंबा मिळाला आहे. कृती समितीने ठामपणे सांगितले की, जोपर्यंत शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत हा लढा सुरू राहील. शेतकऱ्यांनी सरकारला इशारा दिला आहे की, त्यांच्या जमिनी वाचवण्यासाठी ते कोणत्याही थराला जाऊ शकतात. या आंदोलनामुळे शक्तीपीठ महामार्ग प्रकल्पावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

या महामार्गामुळे शेतकऱ्यांची सुपीक जमीन बाधित होणार असून, अनेक शेतकरी भूमिहीन होण्याच्या भीतीने आंदोलनाला पाठिंबा देत आहेत. हा प्रस्तावित महामार्ग नागपूर ते गोवा असा बांधला जाणार आहे आणि तो कोल्हापूर, सांगली, सोलापूर, धाराशिव, लातूर, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, यवतमाळ, वर्धा आणि नागपूर या १२ जिल्ह्यांमधून जाणार आहे. यामुळे हजारो हेक्टर सुपीक शेतजमीन भूसंपादनासाठी जाण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांचा आरोप आहे की, हा महामार्ग बांधण्याची खरी गरज ◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू झाल्याचा आनंद–राजनाथ सिंह

नवी दिल्ली–कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू झाल्याबद्दल राजनाथ सिंह यांनी आनंद व्यक्त केला आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी एससीओ शिखर परिषदेत चीनच्या संरक्षण मंत्र्यांशी द्विपक्षीय चर्चा केली. त्यानंतर, कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू करण्यात आली आहे.

### गेल्या २४ तासांमध्ये राज्यात १३ कोरोनाबाधितांची नोंद

मुंबई–गेल्या २४ तासांमध्ये राज्यात १३ कोरोनाबाधितांची नोंद झाली असून कोविडने एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. मृत्यू झालेला रुग्ण कोल्हापूर जिल्ह्यातील ६५ वर्षीय महिला असून राज्यात सध्या १४८ सक्रिय रुग्ण आहेत.

### एस जयशंकर–इराणचे उपपरराष्ट्र मंत्री अराघची यांची चर्चा

नवी दिल्ली–परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी शुक्रवारी दुपारी इराणचे उपपरराष्ट्र मंत्री अब्बास अरघची यांच्याशी चर्चा केली. या संभाषणादरम्यान, जयशंकर यांनी सध्याच्या गुंतागुंतीच्या परिस्थितीवर इराणचे विचार आणि दृष्टिकोन मांडल्याबद्दल अरघची यांचे आभार मानले. भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात मदत करण्यात इराणने घेतलेल्या भूमिकेबद्दल एस जयशंकर यांनी त्यांचे विशेष कौतुक केले आणि त्यांचे आभार मानले.

### १५० कोटींच्या जागेमुळे संदीपान भुमरेंच्या ड्रायव्हरची चौकशी

संभाजीनगर–१५० कोटींच्या जागेमुळे संदीपान भुमरेंचा ड्रायव्हर अडचणीत आलेला आहे. संदीपान भुमरेंचा ड्रायव्हरची आर्थिक गुन्हे शाखेकडून चौकशी करण्यात येत आहे. ही जागा त्या ड्रायव्हरला हैदराबादच्या सालारजंग कुटुंबाच्या वारसदाराकडून जागा गिफ्ट मिळाली असल्याचे त्याने सांगितले आहे. याची चौकशी आता सुरु आहे.

### बीडच्या हॉटेलमध्ये गॅसच्या टाकीचा स्फोट

बीड– शहरातील मुख्य रस्ता असलेल्या नगर रोडवरील पोलीस अधीक्षक पेट्रोल पंपासमोरील एका साउथ इंडियन हॉटेलमध्ये गॅसच्या टाकीचा स्फोट झाला. यानंतर मोठ्या प्रमाणात आगीचे लोळ उठले होते. तात्काळ पोलीस पेट्रोल पंपातील कर्मचाऱ्यांनी ही आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला मात्र हॉटेलमध्ये चार ते पाच गॅसच्या टाक्या असल्याने आगीचा फडका होत होता. यानंतर अग्निशमन दल दाखल झाले असून आग आटोक्यात आणण्यात यश मिळाले आहे. सुदैवाने यामध्ये कुठलेही जिवीत हानी झाली नाही. टाक्यांमध्ये असलेला गॅस पाण्यासोबत बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू आहे.

### गंगापूर धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवणार

नाशिक–गंगापूर धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवणार आहे. थोड्या वेळात २७२१ क्युसेक पाणी सोडणार आहे. पाणी वाढत असल्याने सोमेश्वर धबधबा पूर्ण वाहू लागला आहे. सोमेश्वर धबधबा परिसरात पर्यटकांची गर्दी झाली आहे.

### उदय सामंत यांच्यावर राऊतांची टीका

मुंबई–उदय सामंत कोणती भूमिका मांडत आहेत. ते शिंदेंचे मंत्री आहेत ना. त्यांनी ठामपणे मराठी माणसाची भूमिका मांडली पाहिजे. शिंदे गटाच्या लोकांनी मराठी माणसाची भूमिका ठाम घेतली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

# गरजू शेतकऱ्यांनाच कर्जमाफी; मर्सिडीजमध्ये फिरणाऱ्यांना नाही !

## महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले सरकारचे धोरण

**अमरावती । प्रतिनिधी**

**राज्यात शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची मागणी दिवसेंदिवस तीव्र होत आहे. याच पार्श्वभूमीवर आता महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कर्जमाफीसंदर्भात शुक्रवारी (दि.२७) वक्तव्य केले आहे. गरजू शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जाईल, असं बावनकुळे यांनी सांगितलं आहे.**



अमरावती जिल्ह्यातील कौडण्यापूर येथील विठ्ठल मंदिराच्या दर्शनानंतरआयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. बावनकुळे म्हणाले, ''खऱ्या गरजू शेतकऱ्यांनाच कर्जमाफी दिली जाईल. ज्यांनी शेतीच्या नावाखाली कर्ज घेऊन मर्सिडीज घेतली, फार्म हाऊस बांधली, किंवा प्लॉट विक्रीचे ले–आऊट तयार केले, अशा लोकांना कर्जमाफी मिळणार नाही.'' पुढे बावनकुळे यांनी धनदांडग्याचा उल्लेख केला. धनदांडग्यांना कर्जमाफीची गरज नाही. शेतकरी खरंच अडचणीत असेल, तर त्याच्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचं बावनकुळे म्हणाले. अलीकडेच प्रहारचे बच्चू कडू यांनी शेतकरी कर्जमाफीसाठी उपोषण केले. त्यांच्या उपोषणानंतर राज्य सरकारने कर्जमाफीसाठी समिती स्थापन करण्याची घोषणा केली. याबद्दल मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्यात येणार असल्याचं बावनकुळे म्हणाले.

''कर्जमाफीसाठी एक उच्चस्तरीय समिती तयार केली जात आहे, आणि ती लवकरच अधिवेशन काळात जाहीर होईल, असे बावनकुळे यांनी सांगितले. ◀◀ पान २ वर

# ठाकरे बंधुंच्या मोर्चाला शरद पवारांचा पाठिंबा



**पुणे । प्रतिनिधी**

**महाराष्ट्रातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी विषय शिकवला जाणार असल्याने त्याविरोधात विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक, शैक्षणिक संघटनांनी एल्गार पुकारला आहे. यासाठी ५ जुलै रोजी मुंबईत मोठ्या मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे या दोन्ही भावांचा आणि त्यांच्या पक्षाचा सहभाग महत्वाचा असणार आहे. या दोन्ही भावांना आता शरद पवारांच्या राष्ट्रावादीने देखील पाठिंबा जाहीर केला आहे. शरद पवारांनी याबाबत पक्षाचे धोरणं नेमके काय हे स्पष्ट केले आहे.**

महाराष्ट्र सरकारच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत प्राथमिक शिक्षणात त्रिभाषा सूत्रान्वये केल्या जाणाऱ्या हिंदी सक्तीला विरोध करण्यासाठी आणि प्राथमिक शिक्षण प्रामुख्याने मातृभाषेतूनच व्हावे ह्या मागणीसाठी येत्या शनिवारी, ५ जुलै २०२५ रोजी तमाम मराठीजनांकडून हिंदीसक्ती विरोधातील मोर्चाला पाठिंबा देताना शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सविस्तर भूमिका मांडणारे एक पत्र काढले आहे. यात ते म्हणतात, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचा या मोर्चाला संपूर्ण पाठिंबा आहे. ◀◀ पान २ वर

# सोन्याच्या दरात सलग चौथ्या दिवशी घसरण

## २४ जूनपासून सोन्याचे दर २७०० रुपयांनी घटले



**मुंबई । प्रतिनिधी**

**सोने आणि चांदीच्या दरात गेल्या चार दिवसांपासून सातत्याने घसरण सुरु आहे. इराण –इस्त्रायल शस्त्रसंधी झाल्यानंतर लोकांचा कल शेअर बाजारातील गुंतवणुकीत वाढला आहे. २४ जूनपासून सोन्याचे दर २७०० रुपयाने घटले आहेत.**

सोने आणि चांदीच्या दरात सलग चौथ्या दिवशी घसरण पाहायला मिळाली. सोन्याचे दर १०२४ रुपयांनी घसरुन ९६१३५ रुपयांवर आले. तर, चांदीचे दर ३५० रुपयांनी घसरुन १०६८०० रुपयांवर आले. २३ जूनला २४ कॅरेट सोन्याचा एक तोळ्याचा दर ९८८८४ रुपये होता. २७ जूनला तो दर ९६१३५ रुपयांवर आला आहे. म्हणजेच सोन्याच्या दरात २७४९ रुपयांची घसरण झाली आहे. जीएसटीसह एक तोळ्याचे सोन्याचे दर एक लाखांच्या खाली आले आहेत. जीएसटीसह सोन्याचा दर ९९०१९ रुपये १० ग्रॅम तर चांदीचा एक किलोचा दर ११०००४ रुपये आहे. ◀◀ पान २ वर

# पंढरपुरात विठुरायाचे २४ तास दर्शन, सर्व राजोपचार बंद

**पंढरपूर । प्रतिनिधी**

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी होत असते. यंदा या यात्रा कालावधीत भाविकांना सुलभ दर्शन मिळावे यासाठी मंदिर समितीने विशेष नियोजन केले आहे. शुक्रवार, २७ जून रोजी शुभ मुहूर्तावर विधिवत पूजेनंतर श्री विठ्ठलाचा पलंग काढण्यात आला. यामुळे भाविकांना २४ तास मुखदर्शन आणि २२.१५ तास पदस्पर्श दर्शनाची सुविधा



उपलब्ध झाली आहे, अशी माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

या कालावधीत श्री विठ्ठलाच्या मूर्तीच्या पाठीमागे लोड, तर रुक्मिणीमातेच्या मूर्तीच्या पाठीमागे तक्क्या ठेवण्यात आल्या आहेत. पलंग काढल्यामुळे काकडा आरती, पोशाख, धूपारती, शेजारती यांसारखे राजोपचार बंद करण्यात आले ◀◀ पान २ वर

# कोलकातामध्ये लॉ कॉलेजच्या कॅम्पसमध्ये विद्यार्थिनीवर गँगरेप

कोलकाता । वृत्तसंस्था

पश्चिम बंगालची राजधानी कोलकाता पुन्हा एकदा एका सामूहिक बलात्काराच्या घटनेने हादरली आहे. आरजी कार रुग्णालयातील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवरील बलात्कार प्रकरणानंतर आता कोलकाता येथील एका लॉ कॉलेजमधील एका विद्यार्थिनीवर सामूहिक बलात्कार झाल्याचे प्रकरण समोर आले आहे.

२५ जूनच्या रात्री कोलकातातील एका लॉ कॉलेजच्या आवारात एका विद्यार्थिनीवर बलात्कार झाल्याची घटना घडली. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. यात दोन विद्यार्थी आणि संस्थेच्या एका कर्मचाऱ्याचा समावेश आहे. सदर कर्मचारी कॉलेजचा ◀◀ पान २ वर

# राज्यातील ६ जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट

## विदर्भात जोरदार पावसाचा अंदाज कायम

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यातील अनेक भागात पाऊस हेजरी लावत आहे. मराठवाडा आणि विदर्भातील काही ठिकाणी अतिवृष्टीचीही नोंद झाली. हवामान विभागाने पुढील ५ दिवस राज्यातील काही भागात जोरदार पावसाचा अंदाज दिला.**

हवामान विभागाने ६ जिल्ह्यांमध्ये जोरदार ते अतिजोरदार पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला. विदर्भातील बुलडाणा, अकोला आणि अमरवती तसेच कोकणातील सिंधुदूर्ग, रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यातील काही भागात जोरदार ते अतिजोरदार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तसेच कोल्हापूर, सातारा आणि पुणे जिल्ह्याच्या घाटमाथ्यावरही जोरदार ते अतिजोरदार ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२७ जुन २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ६८.५० क्विंटल | २,३९० | २,८१२ | २,५७८ |
| ज्वारी/हायब्रिड : ४७.०० क्विंटल | २,००० | २,७४० | २,४७९ |
| मका/लोकल:८.५० क्विंटल | २,२२५ | २,२२५ | २,२२५ |
| तूर : १८.०० क्विंटल | ५,७५१ | ६,३५० | ६,०९२ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ३१.५० क्विंटल | १,९५१ | २,६५१ | २,३८४ |
| मुग :१.०० क्विंटल | ५,००० | ६,२०० | ५,६०० |
| सोयाबीन:९.५० क्विंटल | ४,२५१ | ४,२५१ | ४,२५१ |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ५,३८० | ५,६९० | ५,४९० |

# आषाढी पालखी सोहळ्यातील तीन दिड्यांना निर्मल दिंडी पुरस्कार

## आषाढीला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरण, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचा उपक्रम

**पंढरपूर । प्रतिनिधी**

**आषाढी यात्रेतील सर्व सोहळ्यातील बऱ्याच दिंड्या हे चांगले कार्य करत आहेत, त्यांच्या कार्याचा उचित असा सन्मान व्हावा. त्याचप्रमाणे इतर दिंड्यानीही त्यांचा आदर्श घ्यावा आणि ''निर्मल वारी, हरित वारी अभियान'' मध्ये सहभाग घ्यावा. या जाणिवेतून, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती मार्फत आषाढी यात्रा कालावधीत ''श्री**



**विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार'' सन २०१८ पासून सुरू करण्यात आला आहे. यंदाही पहिल्या तीन दिंड्यांना हे पुरस्कार देण्यात येणार आहेत.**

मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथमहाराज औसेकर यांनी ही माहिती दिली. औसेकर महाराज म्हणाले, पंढरीची पायीवारी ही महाराष्ट्राची प्राचीन, आध्यात्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे. या पायीवारी सोहळ्याची परंपरा अखंड राहण्यासाठी या परंपरेचे रक्षण व संवर्धन करणे हे आपल्या सर्व वारकरी वैष्णवांचे सर्व प्रथम कर्तव्य आहे. हा पायीवारी सोहळा स्वच्छ, निरोगी व निरामय राखण्यासाठी या सोहळ्यातून समाजाला सामाजिक, पर्यावरण, वृक्ष संवर्धन, प्लास्टिक मुक्ती, व्यसनमुक्ती, स्त्रीभ्रूण हत्या यासारखे सामाजिक विषयांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. यासाठी हा पुरस्कार ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# ठाम धोरणाचे यश

भूमिका घेणाऱ्या घोषणापत्रावर स्वाक्षरी करण्यास भारताचे संरक्षणमंत्री राजनाथसिंग यांनी स्पष्ट नकार दिला. त्यामुळे अखेर हे घोषणापत्रच बारगळले. या संयुक्त घोषणापत्राविनाच परिषदेची सांगता झाली. भारताच्या ठाम धोरणाचे हे महत्त्वाचे यश आहे. 'सीएसओ' ही संघटना चीनच्या पुढाकाराने स्थापन झाली आहे. भारत या संघटनेचा सदस्य आहे. त्याचप्रमाणे पाकिस्तान, रशिया, इराण, कझाकिस्तान, किरगिस्तान, उझबेकिस्तान आणि ताजिकिस्तान असे ९ देश या संघटनेचे सदस्य आहेत. त्यांच्या संरक्षणमंत्र्यांची ही परिषद होती. कोणत्याही सदस्य देशांना पक्षपाती वागणूक न देण्याचे या संघटनेचे तत्व असले तरी बऱ्याचदा ते कागदावरच राहते. चीन हा या संघटनेचा प्रमुख आधार असल्याने आणि पाकिस्तान हे चीनचे प्यादे असल्याने, बऱ्याचदा या संघटनेत पाकिस्तानला झुकते माप देण्याचा प्रयत्न होतो, हे लपून राहिलेले नाही. अशावेळी भारत नेहमीच आपल्या धोरणांना अनुसरुन भूमिका घेतो आणि ती स्पष्टपणे मांडतो. याहीवेळी असेच घडले आहे.

या संघटनेने जो संयुक्त घोषणापत्र आणण्याचा प्रयत्न केला, त्यात पहलगाम येथे पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी केलेल्या क्रूर आणि धर्मांध हल्ल्याचा निषेध नव्हता. मात्र, पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील स्वातंत्र्येच्छू बंडखोरांचा मात्र निषेध करण्यात आला होता. बलुचिस्तान बंडखोरांना भारताचे साहाय्य आहे, असा आरोपही पाकिस्तानने केला होता, अशी माहिती समजते. भारताने हा आरोप स्पष्टपणे नाकारला आहे. हे घोषणापत्र प्रसिद्धच न झाल्याने त्यात नेमका कोणता आशय होता, हे अधिकृतरित्या समजू शकत नाही. तथापि, सूत्रांच्या माहितीनुसार भारताच्या दहशतवादविरोधी भूमिकेला या संयुक्त घोषणापत्रात स्थान देण्यात आले नव्हते. त्यामुळे भारताने कणखर धोरण स्वीकारत घोषणापत्रावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला. रशियाची भूमिकाही दहशतवादाला विरोध करणारीच आहे. यामुळे अखेर भारताचे पारडे जड ठरले आणि संयुक्त घोषणापत्र प्रसिद्ध न करण्याचा निर्णय घेण्यात आला. गेल्या दहा वर्षांमध्ये भारताने अशा ठाम निर्धाराचा परिचय अनेकदा घडविला आहे. त्यामुळे भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिमा अधिक प्रभावी झाली आहे. नुकतीच कॅनडात जी-७ परिषद झाली होती. भारताला अतिथी देश म्हणून आमंत्रण होते, त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी या परिषदेला उपस्थित होते. कॅनडात खलिस्तानवादी दहशतवाद्यांना मोकळे रान मिळते, हा भारताचा अनेक दशकांपासूनचा आरोप आहे. गेल्या तीन वर्षात याच मुद्द्यावर भारत आणि कॅनडाचे संबंध ताणले गेले होते. कॅनडातील हरदीपसिंग निज्जर या खलिस्तानवादी अतिरेक्याची तेथे हत्या झाली होती. या हत्येत भारत सरकारचा हात आहे, असा प्रच्छन्न आरोप कॅनडाचे तत्कालीन नेते जस्टीन ट्रूडो यांनी करुन भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला होता. तथापि, भारताने आपल्या भूमिकेत तसूभरही परिवर्तन केले नाही. अखेर कॅनडाला नवे नेते लाभल्यानंतर आता त्या देशाने भारताशी संबंध सुधारण्यासाठी पावले उचलली आहेत. भारतानेही आता मागचा तणाव मागे टाकून कॅनडाशी मैत्री पुनर्स्थापित करण्याची कृती केली आहे. दोन्ही देशांनी एकमेकांच्या दूतावासातील अधिकाऱ्यांना कार्यरत करण्याचा निर्णय घेतला आहे. ही भारताच्या ठाम भूमिकेला मिळालेली पोचपावतीच आहे. याच परिषदेला अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंपही उपस्थित होते. पण ते तेथून लवकर अमेरिकेला परतले. नंतर त्यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरुन चर्चा झाली. या चर्चेतही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट भूमिका घेतल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. पहलगाम हल्ल्याचा प्रतिशोध घेण्यासाठी भारताने 'सिंदूर' अभियानाच्या माध्यमातून पाकिस्तानला जबरदस्त दणका दिला. नंतर पाकिस्तानने विनंती केल्यावरुन शस्त्रसंधी स्वीकारली. या शस्त्रसंधीचे श्रेय ट्रम्प यांनी घेतले होते. तथापि, ही शस्त्रसंधी कोणत्याही तिसऱ्या देशाच्या मध्यस्थीमुळे झालेली नाही, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या चर्चेत स्पष्ट शब्दांमध्ये विशद केले. नंतर ट्रम्प यांनी केलेल्या वक्तव्यात भारत आणि पाकिस्तानने शस्त्रसंधी घडवून मोठे विनाशकारी युद्ध टाळले, असे विधान करुन त्यांची भूमिका मवाळ केली. याचाच अर्थ असा की, भारताने अत्यंत विनयशील आणि विनम्र शब्दांमध्ये पण खंबीरपणे वस्तुस्थिती मांडून आपली बाजू योग्य असल्याचे दर्शवून दिले.

अशा प्रकारे अनेक प्रसंगांमध्ये भारताने आपल्या मूळ तत्वांशी भिडेखातर किंवा दबावात येऊन प्रतारणा केलेली नाही. हे भारत केवळ शब्दांच्या माध्यमातून करत नसून प्रत्यक्ष कृती करण्याची वेळ जेव्हा जेव्हा आली, तेव्हा तशी कठोर आणि निर्णायक कृतीही करायला भारत मागेपुढे पहात नाही, हे सिद्ध झाले आहे. उरीच्या दहशतवादी हल्ल्यानंतरचा सर्जिकल स्ट्राईक, पुलवामा हल्ल्यानंतरचा पाकिस्तानच्या दहशतवादी तळांवर केलेला वायुहल्ला, पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतरचे 'सिंदूर' अभियान, इतकेच नव्हे, तर पाकिस्तानशी व्यापार बंदी, सिंधू जलवितरण कराराला स्थगिती अशा अनेक सामरिक आणि बिगर सामरिक कृती भारताने दहशतवादाविरोधात करुन आपल्यातील कडवेपणा सिद्ध केला आहे. तसेच एक 'सॉफ्ट स्टेट' ही प्रतिमा पुसून टाकून एक 'प्रोॲक्टिव्ह स्टेट' असा लौकिक मिळविला आहे.

# पत्रकारांबद्दल हिन भावना ठेवणाऱ्या डॉक्टरांवर कारवाईची मागणी

## जिल्हाधिकारी यांना निवेदन

जालना । प्रतिनिधी

**जिल्हा शल्य चिकित्सकांच्या कारभारावर संशय आस्था हॉस्पीटलच्या डॉक्टरांकडून पत्रकारांबद्दल केलेल्या वक्तव्याचा निषेध व डॉक्टरांवर कारवाईच्या मागणीसाठी जालना जिल्हा शल्य चिकित्सक यांना निवेदन देण्यासाठी गेलेल्या शिष्टमंडळाकडून निवेदन स्विकारण्यास काहीही न ऐकता चक्क नकार दिल्यामुळे जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या कारभारावर संशय व्यक्त होत असल्याची प्रतिक्रिया दीपक शेळके यांनी माध्यमांशी बोलतांना दिली. ते म्हणाले की, एखाद्या हॉस्पीटलच्या डॉक्टरांची तक्रार ऐकून घेण्यासाठी जर जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडे वेळ नसेल याचा अर्थ हॉस्पीटलचे डॉक्टर आणि त्यांच्यात काही हितसंबंध असण्याी दाट शक्यता आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणी लक्ष घालून जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या कारभाराचीही चौकशी करावी अशी मागणी यावेळी श्री शेळके यांनी केली.**

चौकशीसाठी शिष्टमंडळ नेमा पत्रकारांबद्दल हिन भावना ठेवणाऱ्या डॉक्टरांवर कारवाईच्यामागणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी निवेदन स्विकारले. यावेळी पत्रकारांच्या शिष्टमंडळाने त्यांना प्रकरणाचा व्हिडीओ दाखवला व प्रकरणाचे गांभीर्य लक्षात आणून दिले. यावर श्री महाडीक यांनी कारवाईचे आश्वासन देत जिल्हा शल्य चिकित्सकांना चौकशीसाठी कळविण्यात येणार असल्याचे सांगितले. मात्र, जिल्हा शल्य चिकित्सक यांनी पत्रकारांकारांचे या संदर्भानेच निवेदन घेतले नाही. त्यामुळे त्यांच्याकडे प्रकरण वर्ग न करता संपूर्ण प्रकरणासाठी एखादी समिती नेमूण तपास करावा, अशी मागणी करण्यात येत आहे. जालना येथील आस्था हॉस्पीटलच्या डॉक्टरांनी सर्वच पत्रकारांबद्दल केलेल्या वक्तव्याच्या पत्रकारांच्यावतीने निषेध करण्यात आला असून शुक्रवार (दि २७) रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. पत्रकारांच्या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांची भेट घेत त्यांना प्रकरणाचे गांभीर्य लक्षात आणून देत त्या डॉक्टरांची डिग्री रद्द करण्यात येऊन त्यांची प्रॅक्टीस बंद करण्याची मागणी केली आहे. श्री महाडीक यांनी शिष्टमंडळाला सकारात्मक प्रतिसाद दिला असून कारवाईचे आश्वासन दिले आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आस्था हॉस्पीटल, राजुर रोड कॉर्नर, भोकरदन नाका जालना, येथील प्रशासनातील डॉक्टरांची पत्रकारांबद्दल हीन भावना आहे. या संदर्भातील व्हिडीओ प्रचंड व्हायरल झालेला यात आस्था हॉस्पीटलचे डॉक्टर हे बोलतांना म्हटले आहे की, पत्रकार म्हणून पहिले सांगितले असते तर रुग्णास ॲडमिट करुन घेतले नसते, पत्रकारांचा मुड चेंज होतो, आम्ही पत्रकारांना ॲडमिट करून घेत नाही. असे म्हणत हात जोडत पत्रकारांपासून दूर राहतो असल्याचे म्हटले आहे. आस्था हॉस्पीटलच्या डॉक्टरांचे असे वागणे डॉक्टरी पेशाला शोभत नाही. त्यांनी एखाद्या विशिष्ट समुहाचा द्वेष करणे योग्य नाही. पत्रकारांचा या डॉक्टरांना द्वेष असल्याचे व्हिडीओवरून स्पष्ट होते. अशा डॉक्टरांची मानसिकता पाहता डॉक्टर हे इतर जात-धर्म-समुहाचाही द्वेष करतात याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी रुग्णांचा उपचार योग्य प्रकारे होणार नाही. शिवाय ज्या मृत रुग्णाच्या नातेवाईकास हे डॉक्टर बोलत आहे. त्या मृत व्यक्तीच्या मृत्यूची नेमकी कारणे शोधून यात डॉक्टरांचा हलगर्जीपणा आहे की कसे हे तपासणे ही आवश्यक आहे. डॉक्टरांच्या बेजबाबदार वागण्यामुळे आस्था हॉस्पीटलमधील सर्वच डॉक्टरांची डिग्री रद्द करण्याची कारवाई करण्यात यावी. शिवाय योजनेसंदर्भातही बोलतांना डॉक्टर म्हणतात की, केवळ पन्नास हजार रुपये योजनेतून मिळणार आहे. आणि ते देखील तीन महिन्यांनंतर मिळतात. आम्ही आपल्याला मदत म्हणून हे करतोय. याचा विचार करता योजनेत शासन एखाद्या आजाराचा अर्धवट खर्च देते का? असा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे आस्था हॉस्पीटल प्रशासनाने एकप्रकारे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची खोटे बोलून आर्थिक लुट करत असल्याचे स्पष्ट होते आहे. त्यामुळे आस्था हॉस्पीटलमधील सर्व प्रकारच्या शासकीय योजना तात्काळ बंद करण्यात याव्यात अशी मागणीही निवेदनाद्वारे केली आहे. डॉक्टरांची मानसिकता, बेजबाबदारपणा आणि त्यांची एकंदरीत वागणूक पाहता त्यांची डिग्री रद्द करून त्यांची प्रॅक्टीस बंद करण्यासाठी योग्य ती पावले उचलण्यात यावी. जेणे करून भविष्यात केवळ पत्रकारच नव्हे तर कोणत्याही जात-धर्म-समुहाचा द्वेष ठेवणाऱ्या डॉक्टरांकडून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची वित्त, जीवीत अथवा ईतर कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही. या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून येत्या पंधरा दिवसांत कारवाई करण्यात यावी. अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा ईशाराही निवेदनाच्या शेवटी देण्यात आला.

# संत शिरोमणी नामदेव महाराज पायी दिंडीचे आज जवळबनला आगमन होणार!

## भव्य अश्वरिंगण, किर्तन सोहळा रंगणार ;वारकऱ्यांची भोजनाची व्यवस्था

केज । प्रतिनिधी

संत शिरोमणी श्री नामदेव महाराज संस्थान, नरसी (नामदेव) ता.कळमनुरी जि. हिंगोली यांच्या वतीने पायी दिंडी पालखी सोहळा आषाढी एकादशी निमित्ताने पंढरपूरकडे प्रस्थान झाला असून याचदरम्यान सोमवारी दि.२८ जून २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता अंबाजोगाई -कळंब मार्गावरील बोरीसावरगाव-पावनधाम मार्गे केज तालुक्यातील जवळबन येथे पायी दिंडी पालखी सोहळ्याचे आगमन होणार असून यावेळी गावकऱ्यांच्या वतीने ढोल ताशांच्या गजरात ,पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात दिंडीचे स्वागत करण्यात येणार आहे. गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात संत



नामदेव महाराज पालखीची विधिवत पूजा करून भव्य अश्व रिंगण सोहळा रंगणार

आहे.दिंडीतील महाराजांचे गावात हनुमान मंदिरात कीर्तन संपन्न झाल्यावर उपस्थिती वारकरी व भाविकांची भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.स्व.निवृत्ती सोपान करपे यांच्या पुढाकाराने सुरु झालेल्या जवळबन गावात नामदेव महाराज पायी दिंडी पालखी व भव्य अश्वरिंगण सोहळ्याचे हे ३० वे वर्षे आहे. अश्व रिंगण ,कीर्तन सोहळयात पंचक्रोशीतील वारकऱ्यांनी,भाविकांनी उपस्थिती लावण्याचे आवाहन जवळबन ग्रामस्थ व संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# ऑलिम्पिक स्पर्धेत खेळाडूंनी अधिकाधिक सहभाग नोंदवावा-प्रा.शेळके



बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी ऑलिम्पिक स्पर्धेत सहभाग नोंदवावा,असे मत शिवछत्रपत्री राज्य क्रीडा पुरस्कारार्थी प्रा. जे. पी. शेळके यांनी व्यक्त केले.**

जागतिक ऑलिम्पिक दिन जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे नुकताच (ता.२३) रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शेळके बोलत होते. या कार्यक्रमास जेष्ठ क्रीडा संघटक प्रा. दिनकर थोरात, जेष्ठ क्रीडा संघटीका जया बारगजे, श्री. अफरोज, श्री. पठाण, नितीन गर्जे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले तर आभार क्रीडा मार्गदर्शक अविनाश पाटील यांनी मानले.

# ध्येयाने प्रेरीत झाल्यास यशाचे शिखर गाठता येते-के.डी.दांडगे

**जालना । प्रतिनिधी**

मिटकॉन या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने व उद्योग विकास विभाग यांच्या सहकार्याने यशस्वी उद्योजक संतोष रासवे यांनी आराध्य फ्लोअर मिल फेस नंबर ३,प्लाट नंबर ३६ एमआयडीसी जालना येथे ही कंपनी सुरू केली. त्याना वेळोवेळी के डी दांडगे जिल्हा प्रकल्प अधिकारी मिटकॉन जालना यांचे मार्गदर्शन लाभले .आज दि.२७ जुन २०२५ रोजी श्री दांडगे यांनी या मिलला सदिच्छा भेट देउन संचालक व कामगार यांच्याशी कामकाजा विषयी सविस्तर चर्चा केली. कंपनी चांगली




प्रगती पथावर सुरू आहे असे दिसून आले. या वेळी संचालक संतोष रासवे, प्रदीप रासवे, प्रथमेश रासवे,मुंजा गोरे,गणेश म्हस्के व आकाश शिंदे यांची उपस्थिती होती.नव उद्योजकांना व्यवसाय उभारणीसाठी, व्यवसाय वाढीसाठी ,गुणवत्ता व दर्जा टिकवणे , उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा,व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योग मंडळाच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, राष्ट्रीय पशुधन विकास योजना,प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी ,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने या विषयी माहिती व मार्गदर्शनासाठी के डी दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी मिटकॉन यांनी केले आहे.

# सर्वांच्या सहकार्याने जिल्ह्यातील विकास कामे पूर्ण करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करणार-नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात सर्वांच्या सहकार्याने सकारात्मक काम करण्याचा प्रयत्न राहील. घरकुल योजना, जलजीवन पाणीपुरवठा, नरेगा, शैक्षणिक गुणवत्ता यासह विविध विकास कामे पूर्ण करण्यासाठी आपला प्रयत्न प्रयत्न राहील. शासनाच्या विविध योजना आणि उपक्रम पूर्ण करण्याला प्राधान्य दिले जाईल असे प्रतिपादन बीड जिल्हा परिषदेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी केले. शुक्रवारी जिल्हा परिषदेत पत्रकार संवाद कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान म्हणाले, विविध विभागातील शासनाने दिलेल्या उद्दिष्ट कृतीसाठी आपण प्राधान्याने प्रयत्न करणार आहोत. बीड जिल्ह्यात दिवाळीपर्यंत ७५ हजार घरकुले पूर्ण करण्यात येतील. या योजनेच्या कामासाठी तालुकास्तरावर संगणक देण्यात येणार आहे. व्हाट्सअप चॅट अंतर्गत लाभार्थ्यांना येणाऱ्या अडचणी सोडण्यात येतील. यासाठी जिल्हास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येणार आहे.

जलजीवन अंतर्गत पाणी पुरवठ्याच्या योजना पूर्ण करण्यासाठी कसोशीने प्रयत्न केला जाईल. ग्रामपंचायत यांनी मतदाराच्या अडचणी दूर करण्याचा कसोशीने प्रयत्न करण्यात येणार आहे. नवीन पाणीपुरवठा योजनेला वीज जोडणी करण्यात येईल. ग्रामपंचायत आणि शाळा सक्षमीकरणासाठी प्रयत्न केले जाणार आहे. सरपंचांना पत्र लिहून त्यांच्या कामांना गती आणण्यासाठीचा प्रयत्न केला जाईल. जिल्हा तालुका आणि ग्राम स्तरावरील विविध योजना अधिक गतीने पूर्ण होण्यासाठी सर्वांचे सहकार्य घेतले जाईल. मागील पाच दिवसात बीड जिल्ह्यातील पाच पंचायत समितींना भेटी दिल्या आहेत. तर बीड तालुक्यातील वंजारवाडी आणि पेंडगाव येथील ग्रामपंचायत यांनी



शाळेला आपण भेट दिली. वंजारवाडी येथील ग्रामपंचायत ने विविध विकासाची कामे केली असून एक मॉडेल तयार केले आहे. वंजारवाडी ग्रामपंचायतच्या विकासात्मक कार्याचे त्यांनी कौतुक केले. जिल्हा परिषदेच्या विविध विभागाला भेटी दिल्याचे सांगून जिल्हा परिषदेतील सर्वच विभागातील कामांना गती आणण्यासाठी प्रयत्न केला जाईल. इ संचिका मार्फतच कामकाज सुरू आहे. जिल्हा परिषदेतील प्रतिनियुक्ती संदर्भात चौकशी करून कारवाई करण्यात येईल. असे सांगून सर्वांना सोबत घेऊन आणि सर्वांच्या सहकार्याने काम करण्याचा विश्वास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी दिला. या पत्रकार परिषदेत प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके यांच्यासह पत्रकार उपस्थित होते.

## पान १ वरून...

### शक्तिपीठ महामार्गाविरोधात १

नाही, आणि तो फक्त काही कंत्राटदार आणि मोठ्या कंपन्यांच्या फायद्यासाठी उभारला जात आहे. सतेज पाटील म्हणाले, या मार्गावर आधीच एक राष्ट्रीय महामार्ग आहे. नवीन रस्ता बांधून शेतकऱ्यांचे नुकसान करणे चुकीचे आहे. यापूर्वीही शेतकऱ्यांनी या प्रकल्पाविरोधात मोर्चे, निवेदने आणि आंदोलने केली आहेत. तरीही सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्या गांभीर्याने घेतल्या नाहीत, असा शेतकऱ्यांचा आरोप आहे.

------------

### ठाकरे बंधुंच्या मोर्चाला

महाराष्ट्र हिताचा प्रश्न उभा राहतो तेव्हा महाराष्ट्रासाठी आणि जेव्हा राष्ट्रहिताचा प्रश्न उभा राहतो तेव्हा राष्ट्रासाठी पक्षीय भेदाभेद बाजूला सारून उभे राहणे हेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे स्पष्ट धोरण आहे. म्हणून, मी पक्षाच्या सर्व लोकप्रतिनिधींना, पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आवाहन करत आहे की, येत्या ५ जुलैच्या मोर्चात प्रचंड संख्येने आवर्जून सहभागी व्हा.

------------

### गरजू शेतकऱ्यांनाच कर्जमाफी;

मुख्यमंत्र्यांसोबत कालच यावर चर्चा झाली आहे. ३ जुलै रोजी संध्याकाळी ४ ते रात्री १० दरम्यान बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली विधानभवनात महत्त्वाची बैठक होणार आहे.'' असं बावनकुळे यांनी स्पष्ट केलं. तसेच या बैठकीला ८ ते १० मंत्री उपस्थित राहणार असून कर्जमाफीसंदर्भात अंतिम निर्णय घेतला जाईल, अशी माहिती बावनकुळे यांनी केली. राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचं आश्वासन विधानसभा निवडणुकांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे. परंतु अद्यापही कर्जमाफी कधी करण्यात येणार याबद्दल स्पष्ट संकेत दिले जात नाहीत. योग्य वेळी कर्जमाफी करण्यात येईल, असं म्हणत शेतकऱ्यांची बोळवण केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवरील थकीत कर्जाचा बोजा वाढत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची कोंडी झाली आहे. राज्य सरकारच्या इतर योजनांची माहिती देताना बावनकुळे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात सुरू केलेल्या लाडक्या बहिणींसाठीच्या १५०० रुपयांच्या योजनेचा लाभ पुढे २१०० रुपये केला जाणार आहे. तसेच, शेतकऱ्यांना पुढील ५ वर्षे वीजेचे बिल भरावे लागणार नाही, असा शब्द आमच्या सरकारने दिला आहे.

---------------

### पंढरपुरात विठुरायाचे २४ तास

असून, नित्यपूजा, महानैवेद्य आणि गंधाक्षता हे राजोपचार सुरू राहतील. ही व्यवस्था १६ जुलै रोजी प्रक्षाळपूजेपर्यंत कायम राहणार आहे. यात्रा कालावधीत भाविकांना सहज दर्शन मिळावे यासाठी मंदिर समितीने व्हीआयपी दर्शन, टोकन दर्शन आणि ऑनलाइन दर्शन बुकिंग पूर्णपणे बंद केले आहे. यामुळे वारकऱ्यांना रांगेतून सुलभपणे दर्शन घेता येणार आहे. मंदिर समितीने केलेल्या नियोजनानुसार, दर मिनिटाला ३५ भाविकांना दर्शनाची संधी मिळेल, तर सुमारे ५० हजार भाविक चरणस्पर्श दर्शन रांगेत सहभागी होऊ शकतील. यासाठी दर्शन रांगेची व्यवस्था सुव्यवस्थितपणे करण्यात आली आहे. या सुविधेमुळे वारकरी आणि भाविकांना विठुरायाच्या दर्शनाचा आनंद घेता येणार असून, मंदिर परिसरात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. मंदिर समितीने भाविकांच्या सोयीसाठी सर्वतोपरी प्रयत्न केले असून, यात्रा कालावधील दर्शन व्यवस्था सुरळीत राहावी यासाठी विशेष काळजी घेतली जात आहे.

----------

### सोन्याच्या दरात सलग चौथ्या

२३ कॅरेट सोन्याचा दर १०२० रुपयांनी घसरुन ९५७५० रुपये एक तोळा झाला आहे. तर, २२ कॅरेटच्या एक तोळे सोन्याचा दर ९३८ रुपयांनी घसरुन ८८०६० रुपयांवर आला आहे. १८ कॅरेट आणि १४ कॅरेटच्या सोन्याच्या दरात देखील घसरण झाली. १८ कॅरेटचा दर ७२१०१ तर १४ कॅरेटचा एक तोळ्याचा दर ५६२३९ रुपये इतका आहे. इराण आणि इस्त्रायल यांच्यामधील युद्धाच्या काळात सोन्याचे दर वेगानं वाढत होते. मात्र, इराण- इस्त्रायल यांच्यात शस्त्रसंधी झाल्यानंतर सोन्याचे दर घसरत आहेत. सोन्याचे वरील दर इंडियन बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशननं जारी केले आहेत. वेगवेगळ्या शहरात सोन्याच्या दरांमध्ये १००० ते २००० रुपयांचा फरक असेल. ३१ डिसेंबर २०२४ ला एक तोळे सोन्याचा दर ७६०२५ रुपये होता. तर, चांदीचा एक किलोचा दर ८५६८० रुपये इतका होता. तेव्हापासून सोन्याच्या दरात २०३९५ रुपयांची वाढ झाली आहे तर चांदीच्या दरात २०७८३ रुपयांची वाढ झाली आहे.

-------------

### राज्यातील ६ जिल्ह्यांना पावसाचा

पावसाची शक्यता आहे. तसेच नंदरबार, जळगाव, धुळे, छत्रपती संभाजीनगर, जालना, वाशीम, नागपूर, भंडारा आणि गडचिरोली जिल्ह्यात काही ठिकाणी जोरदार पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला. कोकण आणि विदर्भातील सर्वच जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी जोरदार पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला. रविवारी आणि सोमवारी कोकणातील सर्व जिल्हे आणि मध्य महाराष्ट्राच्या घाटमाथ्यावर काही ठिकाणी जोरदार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला. तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे, असा अंदाज हवामान विभागाने दिला.

----------

### कोलकातामध्ये लॉ कॉलेजच्या

माजी विद्यार्थी असून सध्या तो तृणमूल काँग्रेसचा विद्यार्थी संघटनेचा नेता असल्याचे समजते. मनोजित मिश्रा (३१), जैब अहमद (१९) आणि प्रमित मुखोपाध्याय उर्फ प्रमित मुखर्जी (२०) अशी संशयित आरोपींची नावे आहेत. पीडितेच्या तक्रारीवरून तिघांविरुद्ध गुन्हा नोंद करुन त्यांना अटक करण्यात आली. २५ जून रोजी संध्याकाळी ७:३० ते १०:५० दरम्यान कॉलेजच्या आवारात ही घटना घडल्याचे वृत्त आहे.

----------

### आषाढी पालखी सोहळ्यातील तीन

देण्यात येतात, असे औसेकरमहाराज म्हणाले. आषाढी पालखी सोहळ्यातील पहिल्या तीन क्रमांकाच्या दिंड्यांना आषाढी एकादशी दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान चिन्ह व रक्कमेचा (प्रथम एक लाख, द्वितीय ७५ हजार व तृतीय ५० हजार) धनादेश देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. त्यासाठी ॲड. माधवी निगडे, ह. भ. प. प्रकाश जवंजाळ, वृक्षमित्र ह. भ. प. शिवाजीराव मोरे या मंदिर समितीच्या तीन सदस्याची समिती गठीत करण्यात आली असल्याचे सह अध्यक्ष औसेकर महाराज यांनी सांगितले.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. २८ जून २०२५



## उमाकिरण शैक्षणिक संकुलातील अल्पवयीन मुलीवर अत्याचार दुर्दैवी–अभाविप

बीड । प्रतिनिधी

शहरातील उमाकिरण शिक्षण संकुलामध्ये अल्पवयीन मुलीवर लैंगिक छळ केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला. अल्पवयीन पिडीतेवर दोन्ही शिक्षकांनी अश्लील वर्तन केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला. विजय पवार व प्रशांत खाटोकर यांच्या विरोधात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.

अभाविप बीड शहर सहमंत्री आशिष वारे म्हणाले की, शैक्षणिक संकुलाला काळिमा फासणारी ही अत्यंत दुर्दैवी, निंदनीय घटना आहे. या घटनेची सखोल चौकशी करून दोषींना त्वरित अटक करावी. अशा घटना होऊ नये यासाठी खासगी क्लासेस साठी कठोर नियमावली तयार करावी. बीड शहरातील शैक्षणिक वातावरण या घटनेने गढूळ झाले असून पालकांच्या मनांत भिती निर्माण झाली आहे. या घटनेचा निषेध करित असून पोलिसांनी दोषींना लवकरात लवकर शोधून कडक शासन करावे अशी मागणी करित आहे.

# नारायण गडाचा उत्तराधिकारी ठरविण्यावरून वाद ?

## महंत शिवाजी महाराजांच्या भाच्याला विरोध

बीड । प्रतिनिधी

धाकटी पंढरी म्हणून ओळख असलेला श्रीक्षेत्र नारायण गड सध्या उत्तराधिकाऱ्याच्या नियुक्तीवरून वादात सापडला आहे. महंत शिवाजी महाराज यांनी आपलेच भाचे संभाजी महाराज यांची नियुक्ती केल्याने परिसरातील ग्रामस्थांनी त्याला विरोध करत घराणेशाही नकोचा नारा दिला आहे.



श्री क्षेत्र नारायण गड येथे राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. धाकटी पंढरी म्हणून ओळख असल्याने येथे नेहमीच भक्तांची गर्दी असते. भव्यदिव्य आणि आकर्षक मंदिर सर्वांचे लक्ष वेधून घेते. कोट्यवधी रुपयांच्या निधीतून येथे अनेक विकासकामेही करण्यात आली आहेत. परंतु ११ मार्च २०२५ रोजी नगद नारायण महाराज यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून महंत शिवाजी महाराज यांनी गडाचे दहावे उत्तराधिकारी म्हणून आपलेच भाचे महंत गुरुवर्य संभाजी महाराज यांची नियुक्ती केली. तेव्हा त्यांचे जोरदार स्वागतही झाले होते. परंतु आता या निवडीला विरोध होऊ लागला आहे. यासाठी २२ व २४ जून रोजी गडावर बैठकाही झाल्या आहेत. यात पंचक्रोशीतील अनेक गावचे भक्त, ग्रामस्थ उपस्थित होते.

ग्रामस्थ, भक्तांचे म्हणणे काय?

श्री क्षेत्र नारायण गडाच्या परिसरातील ग्रामस्थ व भक्त हे सकाळ, संध्याकाळ ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता येथे सेवा करतात. कोणताही कार्यक्रम असला तर पुढेही होऊन नियोजन करतात. परंतु या निवडीच्या वेळी त्यांना विश्वासात घेतले नसल्याचा आरोप आहे. तसेच गडावर घराणेशाही नको, असे म्हणत त्यांनी महंत शिवाजी बाबा यांनी नियुक्त केलेल्या त्यांच्याच बहिणीचा मुलगा गुरुवर्य संभाजी महाराज यांच्या निवडीला विरोध केला. दुसरे कोणतेही महंत नियुक्त करा, पण घराणेशाहीचा पायंडा नको, असा नारा त्यांनी दिला आहे.

### २२ व २४ जून रोजी बैठका

२२ जून रोजी रात्रीच्या वेळी या निवडीचा वाद चार भिंतीत मिटविण्याचे ठरले. परंतु त्या दिवशी काहीच झाले नाही. काही लोकांनी विश्वस्तांवरच आक्षेप घेतला. त्यामुळे एका विश्वस्ताने बैठकीतून काढता पाय घेतला होता. त्यानंतर महंत शिवाजी बाबा यांनी २४ जून रोजी सकाळी बैठक बोलावली. परंतु त्या दिवशी ते उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे लोक आणखीनच आक्रमक झाले. त्यांनी गडाच्या ठिकाणीच बैठक घेत अनेक गंभीर आरोप करत संभाजी महाराज यांच्या निवडीला विरोध केला.

### पैसे घेतल्याचा विश्वस्तांवर आरोप

संभाजी महाराज यांची नियुक्ती करताना काही विश्वस्तांनी पैसे घेतल्याचा आरोप बैठकीत लोकांनी केला आहे. तसेच विश्वस्त हे माळकरी, टाळकरी असावेत असा सूर उमटला. सध्याच्या विश्वस्तांपैकी अनेकजण हे राजकीय पदाधिकारी आहेत. परंतु काही लोकांनी राजकीय असल्याने विकासासाठी निधी जास्त आणत असल्याचा दावा केल्याचे सूत्रांनी सांगितले.

## ना.पंकजाताई मुंडे यांच्या स्वप्नातील ग्रीन परळीसाठी महिला सरसावल्या

परळी । प्रतिनिधी

हरित परळी,सुंदर परळी हा उद्देश समोर ठेवत पर्यावरण व पशुसंवर्धनमंत्री ना.पंकजाताई मुंडे व माजी खा.प्रीतमताई मुंडे यांच्या स्वप्नातील ग्रीन परळीचे स्वप्न साकार करण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली परळी शहरात वृक्ष लागवडीची मोहिम राबविण्यात येत असुन या मोहिमेत महिलांचा लक्षणीय सहभाग आहे.



ना. पंकजाताई मुंडे व खा.डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टे यांच्या नेतृत्वाखाली पर्यावरण रक्षणासाठी वैद्यनाथ मंदिराच्या पाठीमागे वेताळ मंदिराच्या जवळील मेरुगिरी प्रदक्षिणा मार्गाच्या बाजुने गुरुवार दि.२६ जुन रोजी वृक्षारोपण करण्यात आल्यानंतर शुक्रवार दि.२७ जुन रोजी परळी शहरातील विविध रस्त्यावर वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी राणी लक्ष्मीबाई टॉवर परिसरात महिलांनी वृक्ष दिंडी काढत वृक्ष लागवडीचा संदेश दिला.या मोहिमेत वेगवेगळ्या जातीच्या ४,५०० वृक्षांची लागवड करण्यात आली. या वृक्षलागवड मोहिमेत भाजपाचे डॉ.शालिनीताई कराड,राजेंद्र ओझा,महादेव इटके,बंडू नाना कोरे, दिलीप नेहरकर,रमेश गायकवाड,विकास हलगे,श्रीनिवास राऊत,बाळू फुले, शिवाजीराव ठोंबरे,चंदाताई ठोंबरे, नंदा पुरभूज,सारिका कुरील,श्रीमती तारामती अग्रवाल,सौ सुरेखा मंत्री, विजयाताई दहिवाळ,चित्राताई देशपांडे,सुनिताताई बोडके,वैशालीताई चिद्रेवार,सौ मंगल देवशेटवार,सुलभा रुद्रवार, अर्चना रुद्रवार,सुरेखाताई मंत्री,सुनंदा निर्मळे,स्वातीताई चाटे, कीर्तीताई झंवर,मनीषाताई चौंडे, अंजूताई ओपळे,छायाताई ओपळे, तसेच परळी शहरातील प्रसिद्ध डॉक्टर सौ. वैशाली गंजेवार, डॉक्टर प्रज्ञा मुंडे, डॉक्टर पूजा तोतला, सरला उपाध्याय, डॉक्टर अर्चना मिसाळ, सोनम डॉक्टर सोनम जाजू, डॉक्टर देवशाला घुगे,डॉ.माया समशेट्टी,डॉ. हर्षा भायेकर,डॉ.सारिका घुगे,डॉ.सुनिता झंवर,सौ मंगल भोईटे,राजकन्या बंग,जनाताई पासेवार,सौ.रिया शेटे,सुजाता गडम,शालिनी बोधे,शांता स्वामी,अनुराधा मोदानी यांच्यासह परळी शहरातील विविध क्षेत्रातील महिला,सामाजिक कार्यकर्त्या, डॉक्टर मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

पान ६ वरून...

### शिवसेना वैद्यकीय मदत

नशिबात नसतं ते आपल्या नशिबी आलं समजून काम करत राहणं हेच डॉक्टर घोलप यांची आवड पहिल्यापासूनच आहे. ते आवडीने हे कार्य करतात आणि करत राहतील अशीच पांडुरंगा चरणी प्रार्थना देखील वारकऱ्यांकडून होते आहे. हे वापरता वेळी वारकऱ्यांकडून मिळणारे आशीर्वाद हेच पांडुरंगाचे आशीर्वाद समजून कार्य करत असल्याचं डॉक्टर सहर्ष घोलप यांनी सांगितले आहे.

**वारकऱ्यांचे आशीर्वाद म्हणजे पांडुरंगाचे आशीर्वाद डॉ.सहर्ष घोलप**

शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष महाराष्ट्र आयोजित एकनाथ आरोग्य सेवार्थ मार्फत मोफत आरोग्य व चरण सेवा आम्ही करत आहोत. यामध्ये अनेक अनुभव पाहायला मिळतात. वारकऱ्यांच्या तोंडून निघालेले शब्द हे पांडुरंगाचे शब्द समजून आम्ही ते आशीर्वाद समजून घेतो.. खरोखरच वारकऱ्यांच्या सेवेतून पांडुरंगाची सेवा घडते असाच भास होतो..

डॉ.सहर्ष घोलप पाटील

शिवसेना वैद्यकीय कक्ष राज्य कार्यकारणी सदस्य..

## नायब तहसीलदार एकनाथ भोजने रुजू

अंबड । प्रतिनिधी

अंबड तहसील कार्यालय मध्ये बऱ्याच महिन्यापासून नायब तहसीलदार महसूल एक हे पद रिक्त होतं अखेर या पदावर शासनाने श्री एकनाथ भोजने यांची नियुक्ती केली आहे. श्री भोजने हे नायब तहसिलदार (निवडणूक), तहसील कार्यालय गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर इथे कार्यरत होते. गंगापूर येथून आता त्यांची बदली अंबड तहसील कार्यालय मध्ये नायब तहसीलदार महसूल एक या पदावर त्यांनी आज पदभार स्वीकारला. श्री एकनाथ भोजने हे १९९८ मध्ये जाफराबाद येथे लिपिक या पदावर होते यानंतर २००८ मध्ये अव्वल कारकून म्हणून घनसावंगी इथे सेवा बजावली यानंतर पदोन्नती झाल्यामुळे २०२३ मध्ये नांदेड जिल्ह्यातील तहसील कार्यालय कंधार येथे नायब तहसीलदार या पदावर होते यानंतर घनसावंगी तसेच गंगापूर येथे नायब तहसीलदार म्हणून प्रशासकीय प्रशासनात चांगली कामगिरी केलेली आहे. आता त्यांनी अंबड तहसील कार्यालयामध्ये नायब तहसीलदार महसूल एक या पदाचा पदभार स्वीकारला यावेळी उद्धव मिसळ श्री कराड काशिनाथ घुंसिकर राजेश चव्हाण शाम विभुते शरद दाभाडे यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांनी श्री भोजने यांचे अभिनंदन केले आहे.



## छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी, श्री गणेश विद्या मंदिर, अंमळनेर (भां.) येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन

**अंमळनेर । प्रतिनिधी**

**दिनांक २६ जून २०२५ रोजी छत्रपती राजश्री शाहू महाराज यांची जयंती श्री गणेश विद्या मंदिर, अंमळनेर (भां.) येथे अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य बडे आर. बी. यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.**



कार्यक्रमाची सुरुवात शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी शाहू महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे, गीत व घोषवाक्य सादर केले. महाराजांनी शिक्षण, सामाजिक न्याय, अस्पृश्यता निवारण आणि सर्वसमावेशक समाज निर्माण करण्यासाठी केलेले कार्य विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. प्राचार्य बडे आर. बी. यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात शाहू महाराजांचे विचार आजही तितकेच प्रभावी असल्याचे सांगितले. "शिक्षण हेच खरे सामर्थ्य आहे" हे तत्त्व अंगीकारून विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श ठेवावा, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संयोजन शाळेतील शिक्षकवर्ग व विद्यार्थी प्रतिनिधींनी मिळून केले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## आधार मल्टीस्टेटने केला पुरस्काराने गौरव ; गुणवंतांच्या पाठीवर दिली कौतुकाची थाप

### छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त डॉ.प्रल्हाद लुलेकर यांचे प्रबोधनपर व्याख्यान

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**येथील आधार मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या वतीने गुरूवारी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय दिन साजरा करून आर्थिक साक्षरता अभियान राबविण्यात आले. या पार्श्वभूमीवर डॉ.प्रल्हाद लुलेकर यांचे प्रबोधनपर व्याख्यान, विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मान तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला.**

हा समारंभ गुरूवार, दिनांक २६ जून २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता अंबाजोगाई येथे आधार मल्टीस्टेटच्या आधार भवन अजिंठा हॉल मध्ये आयोजित करण्यात आला होता. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरचे माजी मराठी विभागप्रमुख तथा ज्येष्ठ साहित्यिक डॉ.प्रल्हाद लुलेकर यांचे डॉ.बी.आर.आंबेडकर यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती सणा प्रमाणे साजरी करा असे का म्हटले होते या विषयावर अतिशय उद्बोधक व्याख्यान दिले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जेष्ठ साहित्यिक तथा खोलेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे यांनी भूषविले. या समारंभात समाजसेवा पुरस्कार – ॲड.संतोष पवार (आधार माणुसकीचा), उत्कृष्ट प्रशासन अधिकारी पुरस्कार – दीपक वजाळे (उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई), विद्याभूषण पुरस्कार – कार्डिओलॉजिस्ट डॉ.दीपक कटारे (अंबाजोगाई, लातूर) , उद्योगभूषण पुरस्कार – प्रकाश मर्लेचा (संचालक, प्रेरणा ड्रेसेस, अंबाजोगाई) यांना



तर उत्कृष्ट साहित्य पुरस्कार – प्रा.डॉ.देविदास खोडेवाड (खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई) या मान्यवरांना प्रदान करण्यात आले. गुरूवार रोजी आधार मल्टीस्टेट अंबाजोगाई शाखेच्या नवव्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने हे विशेष उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते लोकराजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली. स्वागतगीतानंतर प्रास्ताविक प्रा.डी.जी धाकडे यांनी केले. तर आधारचे चेअरमन ॲड.सुनील सौंदरमल यांनी मल्टीस्टेटचे कामकाज कसे चालते याविषयीचे प्रेझेंटेशन सर्वांसमोर मांडले. मान्यवरांच्या स्वागतानंतर विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा विविध पुरस्कारांनी यथोचित सन्मान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप स्मृतीचिन्ह शाल, पुष्पहार आणि श्रीफळ असे होते. पुरस्कार प्राप्त ॲड.पवार व प्रा.डॉ.खोडेवाड यांनी समायोचित मनोगत व्यक्त केले. त्यानंतर आधार मल्टीस्टेटकडून क्रांती विकास एडके (कला शाखा खोलेश्वर महाविद्यालय), गायत्री प्रवीण दहिवाळ (९१ टक्के), वाणिज्य शाखा आदित्य शिवराज गुजर (८१ टक्के), विज्ञान शाखा वैष्णवी चाटे (८० टक्के), संध्या मस्के, अभिजीत कल्याण मुळे (९१ टक्के), आकांक्षा दत्तात्रय नरवटे (८८ टक्के) या गुणवंत विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन कौतुक व अभिनंदन करण्यात आले. त्यानंतर तब्बल दीड तास छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचा संपूर्ण जीवनपट प्रा.डॉ.प्रल्हाद लुलेकर यांनी उलगडला. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.कांबळे यांनी केला. यावेळी मुक्त पत्रकार व साहित्यिक अमर हबीब, डॉ.राहुल धाकडे, दगडू लोमटे, धनराज काळे, लंकेश वेडे, भरत पतंगे, प्रा.डॉ.बाळासाहेब मुंडे, प्रा.पंडित कराड, ॲड.बाबुराव तिडके, ॲड.दिलीप गोरे, ॲड.माणिक गोरे, राजेंद्र घोडके, धोंडीराम जोगदंड, गणपत व्यास, रामकिसन मस्के, माणिकराव बावणे, कचरूलाल सारडा, चंद्रशेखर वडमारे, इंजि.अभिमन्यू चव्हाण, इंजि.विजयानंद बलाढ्ये, डॉ.सुरेश शेळके परभणी, शाखाधिकारी रवी पंडित (परभणी), प्रा.शिवाजी मांदळे, मुख्याध्यापक उषाताई मांदळे, सौ.लक्ष्मीबाई भोसले यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. सुत्रसंचालन आधार मल्टीस्टेटचे अधिकारी अशोक डोंगरे यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ.सुरेश शेळके (परभणी) यांनी करून दिला. आणि उपस्थितांचे आभार मुख्यकार्यकारी अधिकारी विजय राऊत यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

पान ६ वरून...

### राजर्षी शाहुजी महाराज हे

शाहू महाराज यांनी आपल्या जीवनामध्ये रयतेला महत्त्वाचे स्थान दिले होते त्यामुळे त्यांना लोकर्षी म्हणतात असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमच्या यशस्वितेसाठी महात्मा फुले स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले, कार्यकारी अध्यक्ष बी.के.मसने, उपाध्यक्ष रामेश्वर खाडे, सचिव रत्नदीप गोरे, कोषाध्यक्ष संजय साळवे, डॉ.मिलिंद ढगे, संघटक सुनिल नरसिंगे, भाऊराव गवळी तसेच राजकुमार साळवी, प्रा.आदित्य कदम, प्रा.तुषार करपुडे, हेमंत धानोरकर, ताटे, किरण नरसिंगे, यांनी परिश्रम घेतले. यावेळी डॉ.कमलाकर राऊत, भीमाशंकर शिंदे, कलढेले, प्रा.राहुल सुरवसे, नितीन सरवदे, अजिंक्य बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बारावी परीक्षेमध्ये विशेष प्राविण्य मिळविलेल्या कु.स्नेहा साळवे तसेच कु.वैष्णवी काळे या गुणवंतांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.किरण चक्रे, तर पाहुण्यांचा परिचय गणेश कदम यांनी करून दिला, सूत्रसंचालन प्रा.अनिल नरसिंगे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.मिलिंद ढगे यांनी मानले.

### छत्रपती शिवाजी विद्यालयात

मोफत पास योजने अंतर्गत १०० विद्यार्थिनींना मोफत पासचे वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक मनोज सोळंके, बालासाहेब झोडगे, पास वितरण प्रमुख माधव घोलप, आप्पासाहेब होके, विष्णू गडकर, मुरलीधर भाळशंकर,अनंत शेजूळ,दत्तात्रय इंगळे,सय्यद गयास, सत्यप्रिया होके पाटील,शिल्पा शिनगारे,प्रथमेश लांडगे,विशाल राजपूत,दिनकर काळे,दत्ता पांडे यांच्यासह सर्व विद्यार्थिनींची उपस्थिती होती.

### पालखी मार्गावरील खुली

दुकाने थाटली आहेत. सध्या आषाढी महिना सूरू आहे. याच रस्त्यावरून वारकरी संप्रदायांची दिंडी,पालखी मार्गक्रमण होते. माञ येथे उघड्यावर मास विक्री होत आहे याचे कसलेच सोयरसुतक येथील राजकीय पुढारी व पोलिस प्रशासनाला दिसून येत नाही. येणाऱ्या पालख्यांचा सोबत पोलीस देखील चालतांना आढळून येतात मात्र ते त्याच मार्गावर असणाऱ्या खुल्या मांस विक्री करणाऱ्या दुकानदारांना कोणतीही समज दिली जात नाही हे पाहून पोलीसांकडून उलट त्यांना अभय दिले जात असल्याची छुपी चर्चा सध्या शहरवासीयांत होताना दिसून येत आहे.

### पतसंस्था सहकारी संघाच्या

धनराज , अर्थवेल नागरी सहकारी पतसंस्था अंबाजोगाई चे माने बालासाहेब सोपानराव, आदर्श नागरि सहकारी पतसंस्था मर्यादित परळी वैजनाथचे सोळंके अमोल बालासाहेब, एस एन एस नागरी सहकारी पतसंस्था अंबाजोगाई चे कुलकर्णी विनायक भूजंगराव, श्री योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी सह पतसंस्थेचे मसने बालासाहेब काशिनाथ, नगर परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था अंबाजोगाई चे सातपुते संजय रतन, कै व्यंकटराव डावळे रुग्णालयीन कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे मोराळे नितीन बाजीराव, सावता नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बीड चे राऊत किशोर महादेव, तसेच महिला गटातून वीज कामगार कर्मचारी सह पतसंस्था अंबाजोगाईच्या श्रीमती उषा रमेश तपसे आणि माहेश्वरी महिला नागरी सहकारी पतसंस्था माजलगाव च्या श्रीमती सोनाली सागर मानधने यांचा समावेश आहे. सर्व नवनियुक्त सदस्यांची शुक्रवार दि २७ रोजी बैठक होऊन त्यांचातुनच सन २०२५ – २०३० साठी अध्यक्ष पदासाठी कचरू हिरालाल सारडा यांची संस्थेच्या अध्यक्ष पदी फेरनिवड केली आहे. तर उपाध्यक्ष म्हणून मोरे राजू धनराज यांची नियुक्ती करण्यात आली. संस्थेच्या या निवडणूकित अंबाजोगाई पिपल्स बँकेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी यांची मोलाची भूमिका असल्याचे नवनियुक्त अध्यक्ष कचरू सारडा यांनी सांगितले. तसेच त्यांच्याच मार्गदर्शनाखाली यापुढेही आपण आपले कार्य करून बीड जिल्ह्यातील सर्व पतसंस्थाचे असलेले विविध प्रकारचे प्रश्न , अडचणी सोडवून ग्राहकांना अतिशय सुलभतेने सेवा देण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहणार असल्याचे देखील कचरू सारडा यांनी यावेळी नमूद केले. बीड जिल्हा सहकारी पतसंस्थाचा सहकारी संघ मर्यादित बीड , मुख्यालय अंबाजोगाईच्या अध्यक्षपदी कचरू हिरालाल सारडा , उपाध्यक्ष मोरे राजू धनराज यांच्यासह सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे अंबाजोगाई पिपल्स बँकेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी, उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी, कापूस पणन महासंघाचे संचालक ॲड विष्णुपंत सोळंके यांच्यासह प्रा वसंत चव्हाण यांच्यासह शैक्षणिक , सामाजिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रातून अभिनंदन व शुभेच्छा दिल्या जात आहेत.

### शिक्षकी पेशाला काळिमा

परंपरा असताना शिक्षकी पेशाला काळिमा फासणाऱ्या बीड येथील नराधमाला सोडू नका. अनेक पालक लाखो रुपये भरून आपल्या मुला मुलींचं भविष्य घडवतील म्हणून कोचिंग क्लास मध्ये मुलांना पाठवतात व मुलांना शिकवणे त्यांना संस्कारीत करण्या ऐवजी हे दळभद्री नराधम असले चाळे करतात यात पोलिसाने नराधमाला भर नागडं करून ओल्या बाबूने झोडपावे व आरोपीना कसल्याही पळवाटा काढू देऊ नका त्या नराधमावर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी अन्यथा आंदोलन करण्यात येईल असा इशारा राजेंद्र आमटे, सूरज चुगडे यांच्या वतीने देण्यात येत आहे

### हाती टाळ, अंगावर पडणाऱ्या

केली. वारकऱ्यांच्या कुस्त्या, महिलांच्या फुगड्या व मैदानी खेळात भाविक तल्लीन झाले होते. यावेळी रिंगण सोहळ्याचे स्वागताध्यक्ष नंदकिशोर मुंदडा, अक्षय मुंदडा, तहसीलदार विलास तरंगे, प्रकाश बोरगावकर, दिलीप सांगळे, दिलीप गित्ते, बळीराम चोपणे, सारंग पुजारी, संजय गंभीरे,वैजनाथ देशमुख, अनंत आरसुडे,ॲड. संतोष लोमटे, महादू मस्के, व मान्यवरांची उपस्थिती होती. अश्व रिंगण सोहळ्याच्या निमित्ताने वारकऱ्यांसाठी पिण्याचे पाणी व फराळाची व्यवस्था करण्यात आली होती. हा रिंगण सोहळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रशासनाच्या वतीनेही चोख नियोजन करण्यात आले होते. त्यामुळे भविकांना आनंदाने यात सहभागी होता आले. हा रिंगण सोहळा पाहण्यासाठी अंबाजोगाई शहर व पंचक्रोशीतील महिला व भाविकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी पालखी प्रमुखांचा झाला सन्मान संयोजन समितीने केला.

### पहिल्या एकलव्य

समाज एकीकरणासाठी सर्व संघटना प्रयत्नरथ असून आदिवासी समाजातील देव, महापुरुष यांची ओळख चिरंजीव राहावी म्हणून सर्व संघटना प्रयत्न करत आहेत. याचाच एक भाग म्हणून गेली ४० ते ४५ वर्षापासून आदिवासी समाजात शिक्षण तसेच मागास पणा दुर करून चालु समाजाच्या वातावरणात आदिवासी समाजाने यावे या साठी आहोरात्र प्रयत्न करणार्या एकलव्य भिल्ल समाज संघटना महाराष्ट्र च्या संस्थापिका सौ सुमित्राताई दशरथ पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत कोळगाव रोड वर बीड–पाथर्डी–नगर ला जाणार्या बायपास वर एकलव्य चौकाची स्थापना करण्यात आली त्या वेळी समाज एकीचा नारा देण्यात आला त्या वेळी प्रमुख उपस्थिती महाराष्ट्र कार्याध्यक्ष ॲड.सुर्यकांत दशरथ पवार, दंडनायक ग्रुप महा सचिव बलराज पवार,मा भाऊसाहेब शिंदे, बजरंग शिंदे,बबन शिंदे,विलास नेमाने सिध्दू करांडे,नाना बांगर व समाज बांधव मोठ्या संखेने उपस्थित होते.


--------------

## टी.सी.हरवला आहे

प्रगती विकास घोडके या नावाचा बलभीम महाविद्यालयाचा एम कॉम पासचा टिसी बीड –लोळदगाव प्रवास करताना हरवला आहे. सापडल्यास कृपया खालील पत्त्यावर आणून द्यावा.

संपर्क : विकास घोडके
लोळदगाव ता. जि. बीड
मोबाईल क्रमांक ९८ ५० ५२ ५२ ४४

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शनिवार दि.२८ जून २०२४


# पीक कापणी प्रात्यक्षिक प्रयोगावरच ठरणार नुकसान भरपाई

## राज्य सरकारकडून पंतप्रधान कृषी विमा योजनेत मोठे बदल

पुणे : राज्य सरकारने पंतप्रधान कृषी विमा योजनेत मोठे बदल केले असून नुकसान भरपाईसाठी पूर्वीचे निकष रद्द केले आहेत. चालू वर्षासाठी पीक कापणी प्रात्यक्षिक प्रयोगावर आधारितच नुकसान भरपाईची रक्कम ठरवली जाणार आहे.

एक रुपयात पीकविमा योजना ही सरकारने बंद केली असून शेतकऱ्यांना दोन टक्के हिस्सा भरावा लागणार आहे. मात्र, सरकारच्या या नव्या योजनेत शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे, अशी भीती व्यक्त केली जात आहे. राज्याच्या कृषी मंत्रालयाने पंतप्रधान पीकविमा योजनेत मोठे बदल केले आहेत. या संदर्भातील अध्यादेश काढण्यात आला आहे. या आदेशात नमूद केलेल्या बाबीनुसार पीकविम्याच्या नुकसान भरपाईबाबत यापूर्वीचे सर्व निकष रद्द केले असून पूर्वीप्रमाणेच पीक कापणी प्रात्यक्षिक प्रयोगावरच पीकविमा नुकसान भरपाई ठरवली जाणार आहे. मात्र या नव्या योजनेमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे, असा दावा या



क्षेत्रातील जाणकार यांनी व्यक्त केला आहे. सोयाबीनचा पीक विमा भरताना शेतकऱ्यांना भरावे लागणार प्रतिहेक्टरी एक हजार रुपये तर कांद्यासाठी भरावे लागणार ६८० रुपये, तूर ७४४, मूग ७०, उडीद ५००, मका ५४०, भुईमूग ९५, ज्वारी ७०, बाजरी ७६ रुपये शेतकऱ्यांना विमा हप्त्यापोटी भरावे लागणार आहे.

असे आहेत नव्या योजनेतील बदल :

संपूर्ण राज्यासाठी दोनच विमा कंपन्यांची नेमणूक. एकूण संरक्षित रकमेपैकी खरीप पिकासाठी दोन टक्के तर रब्बी हंगामासाठी दीड टक्के रक्कम शेतकरी हिस्सा. नगदी पिकासाठी ५ टक्के शेतकरी हिस्सा. विमा योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकरी ओळखपत्र अनिवार्य. खरीप हंगामामध्ये तृणधान्यात भात (धान), खरीप ज्वारी, बाजरी, नाचणी, मूग, उडीद, तूर व मका तर नगदी पिकामध्ये कापूस व कांद्याचा समावेश. गळीत धान्यामध्ये भुईमूग, तीळ, कारळे व सोयाबीनचा समावेश. रब्बी हंगामासाठी गहू, ज्वारी, हरभरा व उन्हाळी गणित धान्य भुईमूग तर नगदी पिकात रब्बी कांद्याचा समावेश. २०२५-२६ या एकच वर्षासाठी प्रायोगिक तत्त्वावर ही योजना. नैसर्गिक आपत्ती, रोग व कीड प्रादुर्भावामुळे प्रतिकूल परिस्थितीत झालेले नुकसान विमा संरक्षणात.

## शेळ्या-मेंढ्यांना होणाऱ्या फुट रॉट आजाराची लक्षणे व उपचार



फुट रॉट हा शेळ्यांमध्ये होणारा अत्यंत संसर्गजन्य आजार आहे. जो त्यांच्या खुरांवर परिणाम करतो. फुट रॉट या आजारामध्ये शेळ्या आणि मेंढ्यांचे पाय कुजतात. या आजारामध्ये जनावराचे वजन कमी होवुन उत्पादन कमी होते, आणि योग्य उपचार न मिळाल्यास जनावरांचा अकाली मृत्यू होतो. फुट रॉट हा शेळ्यांमध्ये होणारा अत्यंत संसर्गजन्य आजार आहे. जो त्यांच्या खुरांवर परिणाम करतो. फुट रॉट या आजारामध्ये शेळ्या आणि मेंढ्यांचे पाय कुजतात. या आजारामध्ये जनावराचे वजन कमी होवुन उत्पादन कमी होते, आणि योग्य उपचार न मिळाल्यास जनावरांचा अकाली मृत्यू होतो.

या आजाराची लक्षणे : पाय कुजलेल्या शेळ्यांमध्ये वेदनेमुळे अस्वस्थता जाणवेल, प्रभावित खुर सुजतात आणि स्पर्शास कोमल लागतात. गंभीर प्रकरणांमध्ये सूज पाय वर वाढू शकते ज्यामुळे जनावरे लंगडत चालु लागतात. फूटरोटमुळे खुरांमधुन खराब वास येतो, ज्यामुळे प्रभावित खुरातील बॅक्टेरिया वाढीस लागतात. खुरांना तडे गेलेले किंवा खुर खराब झालेले दिसू शकतात आणि त्याचे पृष्ठभाग खडबडीत असू शकते. फूटरोटमुळे प्रभावित खुरातून स्त्राव होऊ शकतो, जे संसर्गाचे महत्वाचे लक्षण असू शकते. पाय कुजलेल्या शेळ्या उभे राहण्यास किंवा चालण्यास अनिच्छा दाखवत असतील, तर वेदना तीव्र असू शकतात. संसर्ग पसरण्यापासून आणि शेळ्यांमध्ये अधिक गंभीर आरोग्य समस्या निर्माण होण्यापासून रोखण्यासाठी शक्य तितक्या लवकर पाय कुजण्याचे निदान आणि उपचार करणे महत्वाचे आहे.

या आजारावर नियंत्रण : पशुवैद्यांच्या सल्ला घेवुन वेळोवेळी जनावरांची नखे छाटावीत. कळपात समाविष्ट करण्यापुर्वी नव्या जनावरांना फूटरॉट आणि इतर जुनाट आजारा नसल्याची खात्री करुन घ्यावी. जनावरांच्या वाहतुक वाहनांचे निर्जंतुकीकरण करणे महत्त्वाचे आहे. फूटरॉट संसर्गचा धोका कमी होण्यासाठी दर ५ ते ७ दिवसांनी १० टक्के झिंक सल्फेटच्या पण्यामध्ये मेंढ्यांना १५ मिनिटांपर्यंत उभे राहण्यास भाग पाडावे. बाधित जनावरे बरी होईपर्यंत कोरड्या जागेत ठेवावीत, कारण ओलाव्यामुळे हा संसर्ग वाढतो. त्याचबरोबर पशुवैद्यांकडुन योग्य तो सल्ला घ्यावा.

## शेतातील काँग्रेस-लव्हाळा गवताचा असा कार कायमचा बंदोबस्त!

शेतीमध्ये उत्पादन वाढवण्यासाठी सर्वांत मोठा अडथळा ठरणारा घटक म्हणजे तणांचा प्रादुर्भाव. विशेषतः काँग्रेस गवत, लव्हाळा, वाघनखी, हरळी यांसारखी तणं शेतात एकदा आली की ती सहजासहजी जात नाहीत. या तणांमुळे पिकांची वाढ खुंटते, उत्पादनात घट होते आणि अनेकदा शेतकऱ्याला मजुरांचा खर्च, वेळ आणि मेहनत वाढवावी लागते. कांदा, लसूण, भाजीपाला, डाळिंब, फुलशेती अशा संवेदनशील पिकांमध्ये सुरुवातीच्या ४ ते ६ आठवड्यांत जर या तणांनी आक्रमण केले, तर उत्पादनात ४० टक्क्यांपासून ते थेट ८० टक्क्यांपर्यंत घट होऊ शकते. तणं पिकांसोबत पाणी, अन्नद्रव्ये, सूर्यप्रकाश आणि जागेची स्पर्धा करतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी तण नियंत्रण ही प्रक्रिया लागवडीच्या आधीपासून आखून करणे आवश्यक ठरते.

तण नियंत्रणाची सुरुवात योग्य मशागतीपासून होते. शेतीची खोल नांगरणी, त्यानंतर दोन वेळा कुळवणी केल्यास मातीतील तण बीज सूर्यप्रकाशाने नष्ट होतात. काही शेतकरी मशागतीनंतर जमिनीत प्लास्टिक मल्चिंगचा वापर करतात, ज्यामुळे जमिनीवर सूर्यप्रकाश न पडल्यामुळे तणांची उगमक्षमता रोखली जाते. याशिवाय सेंद्रिय मल्च म्हणजेच ऊसाचे पाचट, गवत, पेंढा यांचा थर पिकांभोवती पसरवल्यासही तणं उगवत नाहीत आणि मातीतील ओलावा टिकून राहतो.

ही नैसर्गिक पद्धत असल्यामुळे जमिनीचे आरोग्यही चांगले राहते. तण नियंत्रणासाठी खुरपणी ही पारंपरिक पद्धत असून ती अतिशय प्रभावी आहे. हाताने किंवा यंत्राच्या साहाय्याने तणं मुळासकट काढून टाकल्यास पुढील काही आठवडे पुन्हा तण वाढत नाहीत. मात्र ही प्रक्रिया मजुरांवर अवलंबून असल्याने खर्चिक ठरते, विशेषतः मोठ्या क्षेत्रात. यासाठी रासायनिक तणनाशके वापरणे हा पर्याय अनेक शेतकरी निवडतात. पेरणीनंतर लगेच, म्हणजेच २४ ते ४८ तासांच्या आत ''पूर्व उगम तणनाशक'' वापरले, तर ते जमिनीतून उगम होणाऱ्या तणांना नष्ट करते. यामध्ये पेंडीमेथालिन ३०% ईसी (३ मि.ली./लिटर) आणि ऑक्सिफ्लुरोफेन २३.५% ईसी (१ मि.ली./लिटर) हे प्रभावी ठरतात. तणं उगवल्यानंतर जर नियंत्रण करायचं असेल, तर क्लोडिनाफॉप-प्रोपार्गिल, प्रोपॅक्विझाफॉप किंवा क्विझालोफॉप इथाइल यांसारखी निवडक तणनाशके वापरली जातात. फवारणी करताना त्यात सिलिकॉन स्टिकर मिसळल्यास औषध झाडावर चांगल्या प्रकारे पसरते, त्यामुळे परिणामकारकता वाढते.

रासायनिक तणनाशकांचा पिकाच्या मुळांवर दुष्परिणाम होऊ नये म्हणून फवारणीनंतर काही दिवसांनी चिलेटेड झिंक वापरणे फायदेशीर ठरते. तणनाशकांमुळे पिकांच्या मुळांची वाढ थांबू नये, म्हणून अशा पूरक अन्नद्रव्यांचा वापर आवश्यक आहे. नर्सरी अवस्थेत, म्हणजेच बी टाकल्यानंतर १-२ दिवसात फवारणी केली, तर तण उगवण्यापूर्वीच नष्ट होतात. पुनर्लागवडीनंतर ४५-५० दिवसांनी दुसरी फवारणी किंवा खुरपणी करून तण नियंत्रण अधिक परिणामकारक करता येते.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८३८ : इंग्लंडची राणी व्हिक्टोरियाचा राज्याभिषेक झाला.
१८४६ : ॲडॉल्फ सॅक्स याने पॅरिस, फ्रान्समधे 'सॅक्सोफोन' या वाद्याचे पेटंट घेतले.
१९२६ : गोटलिब डेमलर आणि कार्ल बेन्झ यांनी त्यांच्या दोन कंपन्यांचे एकत्रीकरण करून मर्सिडीज-बेंझची स्थापना केली.
१९७२ : दुसऱ्या भारत-पाक युद्धानंतर सिमला परिषदेस प्रारंभ
१९७८ : अमेरिकेतील सर्वोच्च न्यायालयाने महाविद्यालयातील प्रवेशात आरक्षण बेकायदा ठरवले.
१९८१ : चीनने कैलाश मानसरोवर यात्रा करण्यासाठी सडक मार्ग उघडला.
१९८६ : अविवाहित मुलींनाही प्रसूती रजा देण्यासाठी केंद्र सरकारने कायदा केला.
१९९४ : विश्वकरंडक फूटबॉल स्पर्धेत रशियाच्या ओलेम सेलेन्को याने कॅमेरुनविरुद्ध पाच गोल करुन ऐतिहासिक कामगिरी केली. यापूर्वी एकाच सामन्यात चार गोल करण्याची कामगिरी नऊ खेळाडूंनी केली होती.
१९९५ : वाघांना शिकाऱ्यांपासून वाघांचा बचाव करण्यासाठी व त्यांना आश्रय देण्यासाठी मध्यप्रदेश राज्याला 'टायगर्स स्टेट' म्हणून घोषित करण्यात आलं.
१९९७ : मुष्टियुद्धात इव्हान्डर होलिफिल्डच्या कानाचा चावून तुकडा तोडल्यामुळे माईक टायसनला निलंबित करुन होलिफिल्डला विजेता घोषित करण्यात आले.
१९९८ : संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कविषय्क सार्वत्रिक जाहीरनाम्याला पन्नास वर्षे पूर्ण झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४९१ : हेन्री (आठवा) इंग्लंडचा राजा (मृत्यू: २८ जानेवारी १५४७)
१७१२ : रुसो फ्रेन्च विचारवंत, लेखक व संगीतकार (मृत्यू: २ जुलै १७७८)
१८८३ : साली भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेते आणि महात्मा गांधी काशी विद्यापीठाचे संस्थापक तसचं, हिंदी वृत्तपत्र ''दैनिक आज'' चे संस्थापक शिवप्रसाद गुप्त यांचा जन्मदिन.
१९२१ : नरसिंह राव भारताचे ९ वे पंतप्रधान, वाणिज्य व उद्योगमंत्री (मृत्यू: २३ डिसेंबर २००४)
१९२८ : बाबूराव सडवेलकर चित्रकार, कलासमीक्षक, महाराष्ट्राचे कलासंचालक (मृत्यू: २३ नोव्हेंबर २०००)
१९३४ : रॉय गिलख्रिस्ट कसोटी क्रिकेटमधील भेदक वेगवान गोलंदाज म्हणून कारकीर्द गाजवलेले वेस्ट इंडीजचे वादग्रस्त कसोटीपटू (मृत्यू: १८ जुलै २००१)
१९३७ : डॉ. गंगाधर पानतावणे साहित्यिक व समीक्षक
१९७० : मुश्ताक अहमद पाकिस्तानी क्रिकेटपटू व प्रशिक्षक
१९७६ : पद्मश्री पुरस्कार व अर्जुन पुरस्कार सन्मानित उत्कृष्ट भारतीय नेमबाज जसपाल राणा यांचा जन्मदिन.
१९९५ : पद्मश्री पुरस्कार व अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय पॅरालंपिक उंच उडी खेळाडू मरियप्पन थान्गावेलु यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८३६ : जेम्स मॅडिसन अमेरिकेचे चौथे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १६ मार्च १७५१)
१९९० : कवी प्रा. भालचंद खांडेकर यांचे निधन.
१९७२ : प्रसंत चंद्र महालनोबिस भारतीय संख्याशास्त्राचे जनक, 'इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्युट' चे संस्थापक (जन्म: २९ जून १८९३)
१९८७ : पं. गजाननबुवा जोशी शास्त्रीय गायक (जन्म: ३० जानेवारी१९११)
१९९९ : रामचंद्र विठ्ठल तथा रामभाऊ निसळ स्वातंत्र्यसैनिकांचे नेते व झुंजार पत्रकार (जन्म:)
२००० : विष्णू महेश्वर ऊर्फ 'व्ही. एम.' तथा दादासाहेब जोग उद्योजक (जन्म: ६ एप्रिल १९२७)
२००६ : संत साहित्यकार, समीक्षक, वक्ते डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे निधन.
२००७ : जपानच्या पूर्व पंतप्रधान कीची मियाजावा यांचे निधन.
२००९ : भारतीय दिग्दर्शक, निर्माता आणि पटकथालेखक ए. के. लोहितदास यांचे निधन. (जन्म: ६ मे १९५५)

## तोंडली लागवड तंत्रज्ञान



तोंडली ही महाराष्ट्रात विशेषतः कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भातील अनेक भागांमध्ये लागवड केली जाणारी एक उपयुक्त आणि औषधी फळभाजी आहे. ही भाजी फक्त स्वादिष्ट आणि पौष्टिकच नाही, तर तिच्या वैद्यकीय गुणधर्मांमुळे आरोग्यवर्धकही ठरते. मधुमेह, ब्राँकायटिस, त्वचाविकार, जळजळ, दमा अशा अनेक विकारांवर नियंत्रण ठेवणारे घटक तोंडलीत आढळतात. यामध्ये कॅरोटीन, अँटीऑक्सिडंट्स, पोटॅशिअम, फायबर, व्हिटॅमिन सी आणि इतर सूक्ष्म पोषक घटक भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळेच या पिकाची लागवड व्यावसायिक दृष्टिकोनातून वाढत आहे.

लागवड पद्धत : तोंडलीचा वेल एकदा लावल्यानंतर सलग ४ वर्षांपर्यंत उत्पादन देतो. त्यामुळे दीर्घकालीन दृष्टीकोन ठेवून योग्य नियोजन गरजेचे आहे. लागवडीसाठी मध्यम ते भारी, निचऱ्याची चांगली सुविधा असलेली आणि ६ ते ६.५ असलेली जमीन योग्य असते. जमीन तयारी करताना उत्तम प्रकारचे कुजलेले शेणखत मिसळावे. शेवटच्या कुळवणीपूर्वी जमीन पूर्ण तणमुक्त व भुसभुशीत करावी. नांगरणी आणि कुळवणी ही आंतरमशागतीच्या दृष्टीने फायदेशीर ठरते. तोंडलीची लागवड वर्षभर करता येते, मात्र फेब्रुवारी-मार्च व जून-जुलै हे हंगाम सर्वाधिक उपयुक्त मानले जातात. एकदा लागवड केल्यावर ती वर्षभर उत्पादन देते. त्यासाठी २ मीटर उंचीचा बांबू मांडव तयार करून वेलीना आधार द्यावा. वेलवर्गीय असल्याने अधिक लांब वाढ होते. त्यामुळे दोन रोपांमध्ये १ मीटर, ओळींमध्ये १.२ ते १.६ मीटर अंतर ठेवणे महत्त्वाचे ठरते. यामुळे हवा खेळती राहते, रोग आणि किडींचे नियंत्रण सुलभ होते. तोंडलीची लागवड मुख्यतः १०-१५ सेमी लांब व ०.५ सेमी व्यासाच्या काड्यांद्वारे केली जाते. बीजद्वारे लागवड टाळावी कारण बिया घेतल्यास नर-मादी वेलींचे प्रमाण नियंत्रणात राहत नाही. उत्पादनासाठी १० मादी वेलींमागे एक नर वेल पुरेसा असतो. काड्यांची लागवड करताना त्यांना चांगले रोप तयार होण्यासाठी गादीवाफ्यावर शेणखत मिसळून ३० सेमी खोल खड्ड्यांमध्ये रोपांची लांबी आणि तिरपा कोन योग्य ठेवावा.

खत व्यवस्थापन : खते देताना माती परीक्षणावर आधारित संतुलित खत वापरणे महत्त्वाचे आहे. दरवर्षी नत्र, स्फुरद व पालाश या खतांचे प्रमाण अनुक्रमे ६० ते ८० : ४० ते ६० : ४० किलो प्रति हेक्टर याप्रमाणे असावे. शेणखत लागवडीपूर्वीच देण्यात यावे. खते फुलांच्या अवस्थेत आणि फळधारणेनंतरच द्यावीत. सूक्ष्म अन्नद्रव्ये (जसे की झिंक, मॅग्नेशियम, मोलिब्डेनम) यांचा वापर पिकाच्या कमतरतेच्या लक्षणांनुसार करावा.

सिंचन व्यवस्थापन : सिंचन व्यवस्थापनात ठिबक सिंचन पद्धतीचा वापर केल्यास पाण्याची बचत होते. लागवडीनंतर त्वरित पाणी द्यावे. उन्हाळ्यात आठवड्यातून एक वेळ, तर हिवाळ्यात जमिनीतील ओलावा बघून पाणी द्यावे. पावसाळ्यात सिंचन टाळावे, मात्र पाण्याचा निचरा होईल याकडे लक्ष द्यावे कारण पाणी साचल्यास मुळे कुजतात.

आंतरमशागत : तोंडलीच्या वाढीमध्ये आंतरमशागतही महत्त्वाची ठरते. दोन ओळींमध्ये अंतर अधिक असल्याने त्यात तणांची वाढ होण्याची शक्यता असते. त्यामुळे वेळेवर तण नियंत्रणासाठी यांत्रिक मशागत करावी. पीक संरक्षणासाठी फळमाशी आणि भुरी यांसारख्या किडी व रोगांपासून बचाव करण्यासाठी जैविक कीडनाशकांचा वापर शिफारशीप्रमाणे करावा. नीम अर्क, बिवेरिया बॅसियाना, ट्रायकोडर्मा यांसारखे जैविक पर्याय सुरक्षित व प्रभावी ठरतात.

फळ काढणी : फळे तोडताना वेलीला इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. काढणीनंतर फळे स्वच्छ करून त्यांच्या आकारानुसार वर्गवारी व प्रतवारी करावी. बाजारात ताजी तोंडली पोहोचवणे अधिक फायदेशीर ठरते. निर्यात किंवा लांबच्या बाजारासाठी कर्टनमध्ये शास्त्रोक्त पद्धतीने पॅकिंग करावे.

# सरकार देवस्थानांवर मेहेरबान मात्र ज्ञानमंदिर आणि आरोग्य मंदिराकडे दुर्लक्ष

## मंदिर विकासाप्रमाणेच ज्ञानमंदिर, आरोग्य मंदिरासाठीही निधी द्यावा

बीड। प्रतिनिधी

राज्यातील महायुती सरकार देवस्थानांवर चांगलेच मेहेरबान असुन मागील वर्षात मराठवाड्यात तीर्थक्षेत्र क आणि ब मधील ५५९ देवस्थानांच्या विकासासाठी ६२ कोटींचा खर्च होत आहे.तथापि सद्यस्थितीत ५५९ पैकी १२० कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत तर १७८ कामे अद्याप सुरू होण्याच्या प्रतिक्षेत आहेत.मंदिर विकासांची कामे होत असल्याने भाविक भक्तांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. याचवेळी देवस्थानांच्या विकासाला महत्त्व देतानाच मुलांच्या शिक्षणासाठी उपयुक्त ज्ञानमंदिरे आणि आरोग्य सुविधा पुरवणारी आरोग्य मंदिराकडे मात्र सरकारचे दुर्लक्ष होत असुन देवस्थानांच्या विकासाबरोबरच गावातील शाळा आणि आरोग्य केंद्राच्या विकासासाठी ग्रामस्थ आणि पुढा-यांनी पुढाकार घ्यावा आणि सरकारने यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.



मराठवाडा संतांची भूमी म्हणून ओळखली जाते.याठिकाणी मठ, मंदिर आणि देवस्थानांची संख्या आधिक आहे.अनेक गावात ३-४ नावाजलेली देवस्थाने आहेत.त्यांचा विकास व्हावा यासाठी संबंधित ग्रामस्थ कायम प्रयत्नशील असतात.अशाच ५५९ देवस्थानांच्या विकास कामाला सरकारने मागील वर्षी मंजुरी दिलेली आहे.मंजुरी दिल्यानंतर अनेक ठिकाणी तातडीने कामे सुरू करण्यात आली असुन यातील १२० कामे पूर्ण करण्यात आली आहेत.याठिकाणी मंदिर परीसराचे सुशोभीकरण, सभामंडप, पिण्याच्या पाण्याचा हौद, पेव्हर ब्लॉक, विद्युतीकरण अशी आवश्यकतेनुसार कामे करण्यात येत आहेत. संतांची भूमी असलेल्या मराठवाड्यात देवस्थानांची संख्या आधिक आहे .सप्ताह,यात्रा आदि कार्यक्रम होत असल्याने लोकं एकत्र येतात.गाठीभेटी होतात,विचारांची देवाणघेवाण होते.यामुळे देवस्थानांच्या विकासाला महत्त्व दिलेच पाहिजे.परंतु याचवेळी गावातील शाळांना मुलभूत सुविधा आणि आरोग्य सुविधा पुरवणाऱ्या आरोग्य केंद्रांच्या विकासासाठीही ग्रामस्थ आणि पुढा-यांनी पुढाकार घेऊन शासनाकडून निधी उपलब्ध करून घेण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे अशी भावना डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली.४२ टक्के निधी झाला खर्च : तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत ३ वर्ग क साठी ३९२४.७२ लाख रुपये तर ४ ब वर्ग तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमासाठी २३९४.२९ लाख रूपयांचा निधी मंजूर असुन आतापर्यंत यातील ४२ टक्के निधी खर्च झालेला आहे.उपलब्ध उर्वरित निधी अखर्चित राहिल्याने तो शासनाकडे परत गेला तरी तो पुन्हा उपलब्ध होत आहे.

नव्या सरकारकडे ढिगाने प्रस्ताव : मागील वर्षात ५५९ कामांना मंजुरी दिली होती.परंतु नव्याने सत्ता आल्यानंतर लाडकी बहिण योजनेसाठी निधी वळवल्यामुळे सरकारकडे निधीची वानवा असल्याने या वर्षात नविन मंजुरी देण्यात आली नाही.मात्र नव्याने मंजुरी मिळावी यासाठी मागील वर्षापेक्षा जास्त प्रस्ताव शासनाकडे आल्याची माहिती असुन शासनाकडे ढीगभर प्रस्ताव दाखल झाले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी त्यापैकी अनेक कामांना मंजुरी मिळण्याची शक्यता असुन त्यासाठी स्थानिक नेते मंडळी जोर लाऊन प्रयत्न करत आहेत.

### विविध कामांची स्थिती

**जिल्हा -पुर्ण-प्रगतीपथावर-सुरू नसलेली- मंजुर कामे**

लातुर -५७-६७-४८-१८९
बीड -२२-२९-०८-८४
संभाजीनगर -१८-४१-२८-८७
धाराशिव -००-०६-७१-७७
जालना -२०-१३-०४-३७
परभणी -००-५१-००-५१
हिंगोली -००-११-००-११
नांदेड -०३-२५-१९-४८

## शाहू महाराज सामाजिक समानतेचे महानायक -प्रा.खेत्री



पाटोदा। प्रतिनिधी

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक समानता प्रस्थापित करण्यासाठी स्वतःचे आयुष्य वेचले. दिन दुबळ्यांचा कैवार घेऊन त्यांनी अशा समाजाला प्रतिष्ठेने जगण्याचे मार्ग खुले करून दिले म्हणूनच ते सामाजिक समानतेचे महानायक होते असे प्रतिपादन प्रा. हनुमान खेत्री यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २६ जून रोजी छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंतीप्रसंगी आयोजित व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त सामाजिक न्याय दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण करण्यात आले. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. सतीश माउलगे, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड उपस्थित होते.अध्यक्षीय समारोपात प्राचार्य आबासाहेब हांगे म्हणाले की शाहू महाराज हे एक लोक कल्याणकारी राजा होते त्यांनी अनेक समाजसुधारणा घडवून आणल्या व समाजोन्नती केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मनिषा गाढवे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे यांनी केले तर आभार डॉ.लक्ष्मण गाडेकर यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात

### डॉ.सुरेखा गवळी यांची बीड जिल्हा महिला अध्यक्षपदी निवड



माजलगाव : येथील सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयातील सहशिक्षिका तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉ.सुरेखा कचरू गवळी यांची ग्राहक रक्षक समिती (भारत सरकार नोंदणीकृत ग्राहक सेवा सामाजिक बहुउद्देशीय संस्था) च्या बीड जिल्हा महिला विभागाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. ही निवड राष्ट्रीय संस्थापक अध्यक्षा डॉ.आशा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रीय मार्गदर्शक दिलीप फडोळ, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नवनाथ धनवटे यांच्या सहमतीने झाली आहे.सदर निवडीची अधिकृत घोषणा नाशिक येथून ऑनलाईन पद्धतीने करण्यात आली असून, निवडीचे पत्र देखील पाठवण्यात आले आहे. या निवडीबद्दल विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांनी डॉ.सुरेखा गवळी यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.ही निवड सामाजिक कार्यातील त्यांचं योगदान ओळखून करण्यात आल्याने बीड जिल्ह्यातून व माजलगाव तालुक्यातून त्यांचे सर्वत्र स्वागत व अभिनंदन होत आहे.

### शेरखाँ पठाण यांचे दु:खद निधन



माजलगाव : तालुक्यातील फुलेपिंपळगाव येथील रहिवाशी शेरखाँ पठाण यांचे दि.२७ जुन शुक्रवार रोजी सकाळी ११:०० वाजता दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ७२ वर्षे होते. माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक कदिर पठाण यांचे ते वडील होते. फुलेपिंपळगाव येथील शेरखाँ पठाण हे गावासह पंचक्रोषीत मितभाषी व प्रेमळ व्यक्तीमत्व म्हणुन सर्वपरिचीत होते. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांचा दफणवधी दुपारी ४:०० वाजता संपन्न झाला असुन त्यांच्या पश्चात चार भाउ,तिन बहिणी, तिन मुले,तिन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## कोचिंग क्लासमध्ये अल्पवयीन विद्यार्थिनीवर कथित लैंगिक अत्याचार

### आरोपींना राजकीय वरदहस्ताचा आरोप, वंचित बहुजन आघाडीची तात्काळ कारवाईची मागणी



बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील एका नामांकित कोचिंग क्लासमध्ये ३० जुलै २०२४ ते २५ मे २०२५ या कालावधीत अल्पवयीन विद्यार्थिनीवर कथित लैंगिक अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणात कोचिंग क्लासचे शिक्षक प्रशांत खाटोकर व विजय पवार यांच्यावर पीडित विद्यार्थिनीने गंभीर आरोप केले आहेत. या दोघांनी वर्गानंतर केबिनमध्ये बोलावून अश्लील वर्तन केल्याचा आणि तिचे फोटो काढून मानसिक छळ केल्याचा आरोप आहे. पीडितेच्या पालकांनी माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, कायद्याअंतर्गत तसेच भारतीय दंडविधानाच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, दोन्ही आरोपी अद्याप फरार आहेत.

या प्रकरणात आरोपी विजय पवार हे राज्यातील काही राजकीय दिग्गजांशी घनिष्ठ संबंध ठेवत असल्याची माहिती पुढे आली असून, त्यांनी शिक्षण संस्थांच्या माध्यमातून मोठी आर्थिक संपत्ती उभी केल्याचे वृत्त आहे. त्यामुळे या प्रकरणात राजकीय आणि आर्थिक दबावामुळे चौकशीवर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या बीड जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी प्रशासनाला ठाम इशारा देत सांगितले की, ''आरोपींना तात्काळ अटक करून निष्पक्ष व जलद चौकशी व्हावी. या प्रकरणाला कोणत्याही प्रकारे जातीय रंग देण्याचा प्रयत्न होऊ नये.'' त्यांनी पुढील मागण्या केल्या: दोन्ही आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी.

प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी.: पीडितेला मानसिक, वैद्यकीय व कायदेशीर मदत तत्काळ उपलब्ध करून द्यावी.कोचिंग क्लासेससाठी स्पष्ट व सक्त सुरक्षा नियमावली तयार करून लागू करावी.यासंदर्भात जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन आणि पोलीस अधीक्षक श्री. नवनीत सर यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे पुरुषोत्तम वीर, ज्ञानेश्वर कवठेकर, रोहन मगर, लखन जोगदंड, प्रकाश उजगरे, प्रदीप खळगे, मिलिंद सरपते यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.या घटनेने बीड शहरात खळबळ उडाली असून, नागरिकांत संतापाचे वातावरण आहे. आता प्रशासन आणि पोलिसांची भूमिका काय राहते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अंमलीपदार्थ सेवन विरोधी दिनानिमित्त जनजागृती

बीड। प्रतिनिधी

जिल्हा विधीसेवा प्राधिकरण बीडच्या वतीने मध्ये अंमली पदार्थ सेवन विरोधी दिनानिमित्त जनजागृती शिबीर बीडच्या सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालयात काल (ता.२६) पार पडले. कार्यक्रमाच्या सुरूवातीस राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव रेणुका एम. सातव, प्राचार्य डॉ. महेंद्र गोशाल, डॉ. मुजाहिद ईस्माइल, तत्वशिल कांबळे, अशोक तांगडे, मिथुन जोगदंड, शामसुंदर शिंदे, ओंकार नाईकवाडे, रोहन दिवे उपस्थित होते. या शिबीरात महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी आदी बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. महेंद्र गोशाल यांनी केले.अंमली पदार्थ विरोधी जागरूकता आणि नशामुक्ती दिशादर्शक अंमली पदार्थ भारत योजना २०२५, समितीची स्थापना याबाबत श्रीमती सातव यांनी मार्गदर्शन केले. डॉ. मुजाहिद मोहम्मद यांनी व्यसनाचे दुष्परिणाम सांगितले.अशोक तांगडे यांनी सायबर सुरक्षा यावर मार्गदर्शन केले. तत्वशिल कांबळे यांनी व्यसनाचे दुष्परिणाम यावर मार्गदर्शन केले. ओंकार नाईकवाडे यांनी नालसा हेल्पलाईन नंबर १५१०० या विषयी मार्गदर्शन केले.

## चौसाळा येथे महसूल विभागाच्या अंमलबजावणी व जनता दरबार संपन्न



चौसाळा। प्रतिनिधी

चौसाळा येथे महसूल विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अंतर्गत महाराजस्व समाधान शिबिर मा. श्री विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी बीड मा,शिवशंकर स्वामी निवासी उपजिल्हाधिकारी बीडा कविता जाधव उपभागीय अधिकारी मा चंद्रकांत शेळके तहसीलदार बीड यांचे मार्गदर्शनाखाली यांच्या महसुली विभागाच्या विविध योजनांची अंमलबजावणी जनता दरबार करीता शिबिर दि २७/०६/२०२५रोजि आयोजन करण्यात आले होते मध्ये श्रावण बाळ संजय गांधी निराधार अनुदान योजनाअंतर्गत ज्या अनुदानडीबीटी यावेळी बंद पडले होते अशा ३१५ लाभार्थ्यांचीडीबीटी काम पूर्ण करण्यात आले तसेच या मध्येॲग्रो स्टार फेरफार अदालत जिवंत सातबारा मोहीम नकशावरील रस्ते खुले करणेइत्यादी बाबत मार्गदर्शन करण्यात आले तसेच१२५ विविध दाखल्याचे वाटप करण्यात आले सदरील कार्यक्रम्धे मध्ये मंडलाधिकारी डी डी जायभाये ग्राम महसूल अधिकारी तलाठी कमलेश निर्मळ शिवराम येवले निशा खाडेकरअश्विनी अनकर महेंद्र राऊत यांनी कामकाज पाहून कार्यक्रम यशस्वी केला यावेळी चौसाळा सरपंच पती व बाबूशेठ लोढा व बाबासाहेब चव्हाण चायत सदस्यव सर्व ग्रामपंचायत सदस्य सोसायटी चेअरमन दत्तात्रेय नाईकवाडे पत्रकार एनटी वाघमारे पत्रकार विकास सर्वज्ञ तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक शेतकरी महिला बहुसंख्येने लाभार्थी आवर्जून उपस्थित होते यावेळी. शासनसनातर्फे डीबीटी चे काम मोठ्या प्रमाणात झाल्याबद्दल लाभार्थ्यांनी व गावकऱ्यांनी आभार व्यक्त केले.

## 'महिला आर्थिक विकास महामंडळाकडून लाडकी बहीण पतसंस्था सुरु होणार'

बीड। प्रतिनिधी

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात लाडकी बहीण पतसंस्था सुरू करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थी महिलांकडून ७०० रुपयांचे शेअर्स आणि १०० रुपये सभासद शुल्क घेण्यात येणार आहे. त्यानंतर त्या पतसंस्थेच्या सदस्य बनतील. सदस्य झाल्यानंतर त्या महिला आपली रक्कम सुरक्षितपणे जमा करून स्वतःच्या गरजेनुसार कर्जरूपाने खेळते भांडवल मिळवू शकतील.अनेक महिलांना बँकेत खाते काढणे, कर्ज मिळविणे अथवा व्यवसाय सुरू करताना आर्थिक नियोजन करणे कठीण जाते. त्यांच्यासाठी 'लाडकी बहीण पतसंस्था' एक विश्वासार्ह आणि सहजसोपे व्यासपीठ ठरणार आहे. या संस्थेच्या माध्यमातून महिलांना केवळ बचतच नव्हे, तर स्वावलंबनाची नवी दिशा मिळेल, असे महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वय अधिकारी विलास जगताप यांनी प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.बीड जिल्ह्यात लाडकी बहीण पतसंस्था बाबत प्रक्रिया सुरू केली आहे.

## पिंपरखेड येथे छत्रपती शाहू महाराज जयंती



वडवणी। प्रतिनिधी

दि.२६ जून २०२५ छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय पिंपरखेड तालुका वडवणी जिल्हा बीड येथे ,,छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त, भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते ,,त्यानिमित्ताने जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक जोशी सर,, तसेच वाघमारे सर यांचं पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले ..सर्व विद्यार्थ्यांनी सदरील कार्यक्रमांमध्ये स्वयं प्रेरणेने सहभाग नोंदवला.. सदरील कार्यक्रमाच्या निमित्ताने जोशी सर ,वाघमारे सर यांनी आपले अनमोल अशा पद्धतीचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले.. ग्रंथालयीन कर्मचारी सौ शिलाताई सुखदेव उजगरे यांनी विद्यार्थ्यांना सतत वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून,, विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून विद्यार्थ्यांना प्रभावित केले ..सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अग्नी अण्णाभाऊ खळगे यांनी केले ..सदरील कार्यक्रमाचे प्रस्तावित ,,सचिव प्रकाश तुळशीराम खळगे सर यांनी करून,, विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त या संस्कार केंद्राचा फायदा घ्यावा,, महापुरुषांचे विचार आत्मसात करावेत ,,व आपलं भविष्य घडवण्यासाठी सतत प्रयत्नशील असावे ,,असे आव्हान करून,, या वाचनालयाच्या माध्यमातून सर्वांनी ,,मोफत पुस्तके ,,घेऊन जावेत.. आपलं जीवन उंच पातळीवर घेऊन जावे.. आपल्या कुटुंबाचा,, आपल्या स्वतःचा,, देशाचा व राष्ट्राचा विकास करणारी पिढी व समाजसेवक निर्माण व्हावेत,, अशी अपेक्षा व्यक्त केली ..सर्वच विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले ..अल्प उपहार देऊन सर्वांचे आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता झाली.


**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती टी. ए. आसरकर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर. बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ८३२/२०२५**

**मार्फत ॲड एम. आर. उबाळे**

**शौकत व ईतर विरुध्द निरंक**

अर्जदार: १) शौकत शब्बीर पठाण, वय ६२ वर्ष, धंदा शेती पत्ता- खामगांव ता. जि. बीड, २) सादिका अहेमद शेख, वय ७५ वर्ष, धंदा घरकाम आहेर वाहेगांव ता. गेवराई जि. बीड

३) हमिदाबी शब्बीरखॉ पठाण वय ७१ वर्ष धंदा घरकाम, रा. खामगांव ता जि बीड

विरुद्ध मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत शब्बीरखाँ महेबुबखाँ पठाण याचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत शब्बीरखॉ महेबुबखाँ पठाण याचा मृत्यु दि. ३०/०५/२०२३ रोजी खामगाव, ता.जि बीड येथे झाला आहे. अर्जदार ही मयताची आई आहे. मयत हा अविवाहीत होता वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यानी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीय पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत. शब्बीरखॉ महेबुबखाँ पठाण यांचे वारस असल्याबावतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८ माहे जानेवारी २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २३/०७/२०२५

स्वाक्षरित
**क. लिपीक**

आदेशावरुन,
स्वाक्षरीत
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड.


## पाटोद्यात जलजीवन मिशन प्रशिक्षणाचा बोजवारा ;दुपारच्या सत्रात गायब

पाटोदा। प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील ५९ ग्रामपंचायत मध्ये जलजिवन योजना राबविण्यात येत असून जल महत्त्व पटवून देण्यासाठी. राज्य पाणी व स्वच्छता मिशन कक्ष महाराष्ट्र शासन जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष जिल्हा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जल जीवन मिशन जलसाक्षरता दोन दिवशी अनिवासी प्रशिक्षण कार्यक्रम सध्या दि.२६ व २७ रोजी पाटोद्यात चालू असून मात्र या प्रशिक्षणाला प्रत्येक ग्रामपंचायत मधून पाच जण येणे आवश्यक असून मात्र याठिकाणी बहुतांश कर्मचारी . सरपंच.सदस्य सह आदी हे दि.२६ रोजी आले नसुन दुपारच्या सत्रात तर बहुतांशी आलेच नाहीत यामुळे प्रशिक्षणाचा बोजवारा उडाला असून संबंधित पाटोदा पंचायत समिती स्वच्छता अभियानाचे कर्मचारी हेच बोगस सह्या करून गैरहजर असले लेही हजर दाखवून जेवण केले दाखवले जात आहे. जे काही प्रशिक्षणाला आले होते ते बाहेर फिरत होते फक्त.नोंद हे दाखवत असुन या प्रशिक्षणाचा बोजवारा उडाला आहे तरी याकडे बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लक्ष देऊन तात्काळ या प्रशिक्षणाची चौकशी करावी अशी मागणी होत आहे.

### मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करावी



महाराष्ट्र शासन जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष जिल्हा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जल जीवन मिशन जलसाक्षरता दोन दिवशी अनिवासी प्रशिक्षण कार्यक्रम सध्या दि.२६ व २७ रोजी पाटोद्यात चालू असून या प्रशिक्षणाला ग्रामपंचायत अधिकारी. जलसुरक्षक. सरपंच. उपसरपंच. सदस्य. पाणीपुरवठा व स्वच्छता समितीअध्यक्ष. सचिव.महिला.सदस्य. ग्राम संघाच्या दोन महिला.जलसाक्षरता विषयक अनिवासी दोन प्रशिक्षण ५९ ग्रामपंचायत मधील पाच जण बोलवले आहेत. मात्र दि.२६ रोजी हे बहुतांशी आलेच नसुन अन जे आले होते ते दुपारच्या सत्रात गायब झाले होते यामुळे या प्रशिक्षणाचा बोजवारा उडाला असून संबंधित पाटोदा पंचायत समिती स्वच्छता अभियानाचे कर्मचारी हेच बोगस सह्या करून गैरहजर असले तरी हजर दाखवून जेवण केले दाखवले जात आहे. जे काही प्रशिक्षणाला आले होते ते बाहेर फिरत होते बोगस फक्त नोंद हे दाखवत असुन या प्रशिक्षणाचा बोजवारा उडाला आहे तरी याकडे बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लक्ष देऊन तात्काळ या प्रशिक्षण ची चौकशी करावी व पाटोदा पंचायत समितीच्या स्वच्छता विभागाची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

तालुक्यात जलजीवन योजनेच्या अनेक योजना बोगस असून अनेक गावांमध्ये तर टाकी आहे तर काही ठिकाणी नळ योजना नाही या सर्व बाबीची बहुतांशी सरपंच आम्हाला माहीतच नाही तरी याची चौकशी करून या प्रशिक्षणाची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी एका सरपंचांनी केली आहे..


### टीसी हरवला आहे

प्रसेजिंत चंद्रकांत कारके रा.अंबड ता.अंबड जि.जालना याची इयत्ता १० वी पासची जैन इंग्लिश स्कूल ची टिसी अंबड जालना प्रवासा दरम्यान हरवली आहे. सापडल्यास संपर्क साधावा.

**संपर्क**
**९९२१६८४५८६**

# राजर्षी शाहु महाराज हे उपेक्षित, वंचितांचे लोकनायक आहेत - डॉ.राजेश इंगोले

## शाहू महाराजांचे लोककल्याणकारी राज्य आजचे राज्यकर्ते का निर्माण करू शकत नाहीत - प्रा.गौतम गायकवाड

### अंबाजोगाईत छत्रपती शाहूजी महाराज जयंती उत्साहात साजरी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महात्मा फुले स्मारक समिती अंबाजोगाई तर्फे छत्रपती राजर्षी शाहूजी महाराज यांची १५१ वी जयंती मोठ्या उत्साहात स्मारक समिती नगरात साजरी करण्यात आली. यावेळी विचारमंचावर सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते तर कार्यक्रमाला प्रमुख व्याख्याता म्हणून खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य लेखक विचारवंत प्रा.गौतम गायकवाड यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात छत्रपती शाहूजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली. प्रमुख व्याख्याते उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांनी बोलताना छत्रपती शाहू महाराज यांचा जीवन कार्य उलगडून दाखवत असताना त्याचे अनेक पैलू आजच्या सामाजिक परिस्थिती मध्ये लागू कसे करता येतील यावर विचार मंथन केले. छत्रपती राजर्षी शाहू महाराज व घटनाकार संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर





यांचे परस्पर संबंध कसे होते. याचा उहापोह उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांनी केला. छत्रपती शाहू महाराजांच्या लोककल्याणकारी राज्यात सर्व प्रजा सुखी होती समाधानी होते शेतकरी आनंदाने जगत होता. मात्र आजची राजकीय परिस्थिती सामाजिक परिस्थिती पाहीली तर सर्वत्र हातास चित्र दिसत आहे सर्वसामान्य जनता महागाईने त्रस्त झालेली आहे जाती धर्मांच्या देशामुळे भारत हे अखंड राष्ट्र फुटीच्या मार्गावर जात आहे. की, काय अशी शंका येत आहे छत्रपती शाहू महाराजांनी तसे लोक कल्याणकारी राज्य उभारले तसे आजच्या राज्यकर्त्यांना ते राज्य उभा करणे का जमत नाही..? असा सवाल उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांनी केला. आपले अध्यक्षीय समारोपपर मनोगत व्यक्त करताना डॉ.राजेश इंगोले यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, शेती, अर्थ विषयक विचार हे सर्वसामान्य जनतेच्या हिताचा विचार करून केलेले होते. त्यामुळे शाहू महाराजांची राज्य हे खऱ्या अर्थाने लोकराज्य होते लोककल्याणकारी राज्य होते. आणि त्यामुळे तेथील प्रजा अत्यंत सुखी समाधानी होती. छत्रपती शाहू महाराजांनी वंचित, उपेक्षित वर्गांना सामाजिक मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षण ही संकल्पना राबविली. त्याच संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्याचे काम घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. छत्रपती शाहू महाराजांचा स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय हा विचार घटनेमध्ये प्रामुख्याने जाणवतो. छत्रपती शाहू महाराजांच्या अलौकिक कार्य केवळ सर्वसामान्य वंचित उपेक्षित घटकांसाठी होते त्यामुळे छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने वंचितांचे लोकनायक होते असे गौरवोद्गार डॉ.राजेश इंगोले यांनी केले. समितीचे कार्यकारी अध्यक्ष बी.के.मसने यांनी छत्रपती राजर्षी



माजलगाव:- गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयराजे पंडित व माजलगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवीन कार्यालयास सदिच्छा भेट दिली असता त्यांचा सत्कार करताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त अण्णा नरवडे, संचालक डॉ.उद्धव नाईकनवरे,मनोज तात्या जगताप, नंदकिशोर सजगणे, जुगल किशोर नावंदर,सचिव सवणे व सहसचिव रवी नाईकनवरे



### पहिल्या एकलव्य चौकाची आदिवासी समाज बांधवांच्या उपस्थितीमध्ये स्थापना

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील पहिल्या एकलव्य चौकाची स्थापना सुमित्राताई पवार यांच्या पुढाकारामुळे कोळगांव बायपास येथे आदिवासी समाज बांधवांच्या उपस्थितीमध्ये स्थापना काल २६ जून २०२५ रोजी करण्यात आली.

आदिवासी ◄◄ पान ३ वर

### छत्रपती शिवाजी विद्यालयात विद्यार्थिनींना मोफत पासचे वितरण

माजलगाव । प्रतिनिधी

येथील छत्रपती शिवाजी विद्यालयात माजलगाव बस स्थानकाच्या वतीने अहिल्याबाई होळकर मोफत पास योजनेअंतर्गत १०० विद्यार्थिनींना संस्थेचे सचिव माजी नगराध्यक्ष अशोक होके पाटील,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष इनायतखान पठाण,आगार प्रमुख शैलेश जोशी, वाहतूक नियंत्रक अजहर सिद्धीकी यांच्याहस्ते मोफत पास वाटप करण्यात आले.



येथील छत्रपती शिवाजी विद्यालयात घळाटवाडी, पवारवाडी, हिंगणवाडी,पात्रूड, हनुमाननगर तांडा येथून विद्यार्थी शिक्षणासाठी ये -जा करतात.या विद्यार्थिनींना शाळेत येण्यासाठी सोय व्हावी, यासाठी प्रत्येक गावात बसची सोय करण्यात आली आहे.तसेच अहिल्याबाई होळकर ◄◄ पान ३ वर

## पतसंस्था सहकारी संघाच्या अध्यक्षपदी कचरू सारडा तर उपाध्यक्ष म्हणून राजू मोरे बिनविरोध

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड जिल्हा सहकारी पतसंस्थाचा सहकारी संघ मर्यादित बीड मुख्यालय अंबाजोगाईच्या अध्यक्ष पदी श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेचे कचरू हिरालाल सारडा यांची अध्यक्ष पदी तर उपाध्यक्ष पदी राजश्री शाहू नागरी सहकारी पतसंस्थेचे मोरे राजू धनराज यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या संस्थेची पंचवार्षिक २०२५ ते २०३० साठीची निवडणूक नुकतीच निर्वाचन अधिकारी



संतोष भंडारी यांच्या अधिपत्याखाली संपन्न झाली. १३ सदस्य असलेल्या जागांसाठी केवळ १३ उमेदवारांचेच अर्ज आल्यानं सदरील निवडणूक ही बिनविरोध झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी संतोष भंडारी यांनी जाहीर केले.

बिनविरोध पणे निवडून आलेल्या सदस्यांमध्ये श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था अंबाजोगाईचे कचरू हिरालाल सारडा, सन्मति नागरी सहकारी पतसंस्था अंबाजोगाईचे देशमाने अरविंद शांतिकुमार, समर्थ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित माजलगावचे प्रभुणे उमेश रत्नाकर, राजश्री शाहू नागरि सहकारी पतसंस्था अंबाजोगाईचे मोरे राजू ◄◄ पान ३ वर

## पालखी मार्गावरील खुली मांस विक्री दुकाने बंद करण्याची भाविकांची मागणी

### वर्तमानपत्र विक्रेत्यांवर पोलिसांची दंडमशाही

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सध्या आषाढी एकादशीला पंढरपूर कडे जानाऱ्या शेकडो पालख्या पालखी मार्गावरून मार्गक्रमण करत आहेत. अशाच पालख्या अंबाजोगाई शहरातील मुख्य पालखी मार्गावरून जात आहेत. पालखीतील शेकडो वारकरी ज्या रस्त्यावरून जातात अशा अंबाजोगाई शहरातील पंचायत समितीत कार्यालयासमोरील खुल्या मास विक्रीची दुकानांनी मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण करून मास विक्रीची दुकाने थाटली आहेत. या दुकानासमोरून जातांना वारकरी आपल्या



इष्टगुरूंच्या पालख्या घेऊन जातांना शरमेने माना खाली घालुन जाताना दिसून येत आहेत. शहरातील पालखी मार्गावरील असलेली खुल्या मांस विक्रीची दुकाने तात्काळ बंद करण्याची मागणी भाविकांच्या वतीने करण्यात येत आहे.मांस विक्रेत्यांची दुकानांचे अतिक्रमण हटवण्याऐवजी वर्तमानपत्र विकून उदरनिर्वाह करणाऱ्यांवरच पोलिसांकडून दमदाटी होत आहे.यांवर नाहक विविध चर्चांना तोंड फुटत आहे.

भर रस्त्यावर उघड्यावर असलेल्या चिकन मटणाच्या दुकानाकडे पोलिस प्रशासन हे कशामुळे डोळेझाक करत आहे असा संतप्त सवाल देखिल वारकरी तथा भाविकांतुन उपस्थित केला जात आहे. पंचायत समिती कार्यालयासमोर राजकमल हॉटेल ते पं.स.कार्यालय गेट पर्यंत अनेक चिकन मटणाची ◄◄ पान ३ वर

## शिक्षकी पेशाला काळिमा फासणाऱ्या नराधमाला सोडू नका-आमटे, चुगडे

### नराधमाला नागडं करून, ओल्या बाबूने भर चौकात झोडपा

बीड । प्रतिनिधी

बीड येथील नामांकित उमाकिरण संकुल येथे प्रोफेशल अकादमी मधील विध्यार्थीनी बाबत झालेला प्रकार अतिशय निदानीय आहे आज शिक्षक हा राष्ट्र निर्मितीचा महत्वाचा कण मानला जातो परंतु शिक्षकच व्यभिचारी दुराचारी असेल तर मुलानी आदर्श कोणाचा घ्यायचा?, उमाकिरण संकुल मधील प्रोफेशल कोचिंग क्लास मधील प्रशांत खाटोकर,





प्रा विजय पवार या नराधमांनी केलेला प्रकार शिक्षकी पेशाला कलमा फासणारा असून शिक्षकी पेशाला काळिमा फासणाऱ्या नराधमाला सोडू नका त्याच्यावर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी असे आवाहन राजेंद्र आमटे, सूरज चुगडे यांच्या वतीने करण्यात येत आहे आज भारत विश्व गुरू म्हणून ओळखला जात असताना गुरू शिष्य परंपरेचा खूप मोठी उज्ज्वल ◄◄ पान ३ वर

## शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष डॉ.सहर्ष घोलप यांच्या पुढाकारातून वारकऱ्यांच्या सेवेसाठी सक्रिय!

बीड प्रतिनिधी

नुकतीच काही दिवसापूर्वी डॉक्टर सहर्ष घोलप यांची शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या राज्य कार्यकारणीवर नियुक्ती करण्यात आली होती. आरोग्य सेवेतील कार्यकाळ व संघटन कौशल्य उत्तम असल्याने त्यांना मोठी जबाबदारी पक्षाकडून देण्यात आली होती. आत्ता आषाढीनिमित्त येणाऱ्या दिंडीतील वारकऱ्यांच्या सेवेसाठी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष महाराष्ट्र आयोजित वारकऱ्यांसाठी



एकनाथ आरोग्यसेवा रथ मार्फत मोफत आरोग्य व चरण सेवा शिबिर सुरू करून जनसेवेचा वसा कायम सुरू आहे. यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब, सातारा पालकमंत्री शंभूराजे देसाई, महाराष्ट्राचे आरोग्यदूत मंगेश चिवटे तसेच युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण, कार्याध्यक्ष रामभाऊ राऊत यांचे वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन मिळत आहे..

शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष महाराष्ट्र राज्याच्या राज्य कार्यकारणीवर काही दिवसापूर्वी डॉक्टर सहर्ष घोलप पाटील यांची निवड करण्यात आली होती. घोलप पाटील यांच्या नसानसामध्ये जनसेवा वाहत आहे. पद मिळताच पुन्हा एकदा सक्रिय काम करण्याला संधी मिळाली आणि त्यांनी शिवसेना वैद्यकीय कक्ष महाराष्ट्र आयोजित वारकऱ्यांसाठी एकनाथ आरोग्यसेवा रथ मार्फत आरोग्य व चरण सेवा शिबिरा मार्फत वारकऱ्यांची सेवा सुरू केली. आणि सामाजिक वसा पुढे घेऊन जात असल्याचं सुद्धा त्यांनी दाखवून दिले आहे. सहकाऱ्यांना सोबत घेऊन वारकऱ्यांची सेवा हे मिळालेलं भाग्यच आहे. असं भाग्य कोणाच्या ◄◄ पान ३ वर

# हाती टाळ, अंगावर पडणाऱ्या जलधारा, अन् मुखी ज्ञानोबा तुकारामचा जयघोष

## पालख्यांच्या रिंगण सोहळ्याने अंबाजोगाईकरांच्या डोळ्यांचे पारणं फेडले, अश्व धावले रिंगणी, अन् तुका झाला आकाशा एवढा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**अंबाजोगाई शहरात गुरुवारी सायंकाळी योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या मैदानवर चार पालख्यांचा एकत्रिरित्या रिंगण सोहळा उत्साहात पार पडला.अश्वरिंगण सोहळा पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. वारकऱ्यांचे विविध मैदानी खेळ, महिलांच्या फुगड्या, बाल वारकऱ्यांची झालेली दिंडी स्पर्धा. हे या सोहळ्याचे खास आकर्षण ठरले.**

आषाढी एकादशीच्या निमित्त पंढरपूरकडे जाणाऱ्या अनेक दिंडया





व पालख्या अंबाजोगाई मार्गे जातात. या दिंडीतील वारकरी मागील दहा वर्षांपासून अंबाजोगाई येथे अश्वरिंगण सोहळ्याचे आयोजन करतात. गुरूवारी हिंगोली जिल्ह्यातील नरसीचे संत नामदेव यांची पालखी, अंबाजोगाईतील महसूल विभागाची पालखी, संत मोहनानंद महाराज यांची पालखी, तर चारोधाम हनुमान पायी पालखी यांची पालखी शहरात दाखल झाली. या दिंडयांना टाळ-मृंदगासह विठ्ठलनामाच्या गजरात योगेश्वरी मैदान येथे बँड पथक व फटाक्यांच्या आतिषबाजीत आणण्यात आले. यावेळी संयोजन समितीच्या वतीने ध्वजारोहण, पालखी पूजन व अश्वपूजा करण्यात आली. यानंतर मनोहरी रिंगण सोहळा पार पडला. 'अश्व धावले रिंगणी अन्? तुका झाला आकाशाएवढा' अशी अनुभती अंबाजोगाईकरांनी अनुभवली. या सोहळ्यात देखणा व सजविलेला अश्व, भगवी पताका हाती घेतलेले वारकरी लक्ष ठेवून घेत होते. संत ज्ञानेश्वरांनी भिंत चालविलेल्या देखाव्याची भाविकांनी प्रशंसा ◄◄ पान ३ वर

### दिंडया एकत्रीकरणसाठी प्रयत्नशील: मुंदडा

विदर्भ, मराठवाडा व परिसरातून अंबाजोगाईमार्गे जवळपास २७४ दिंडया पंढरपूरकरडे जातात. छोट्या -मोठ्या दिंडयांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. वारकयांची गैरसोय टाळण्यासाठी आगामी काळात या छोट्या दिंडयांना एकत्रित करून या सर्व दिंडया नरसी नामदेव महाराज व संत जनाबाई यांच्या दिंडयासोंबत एकत्रित कशा जातील? यासाठी आपण अश्वरिंगण सोहळ्याचा स्वागताध्यक्ष म्हणून प्रयत्न करणार असल्याचे स्वागताध्यक्ष नंदकिशोर मुंदडा म्हणाले.

### वारकरी वेशभूषा स्पर्धेचे आयोजन:

आज झालेल्या पालखी रिंगण सोहळ्याच्या निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांसाठी लहान गट व मोठ्या गटात बाल वारकरी वेशभूषा स्पर्धेचे आयोजन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले होते. या स्पर्धेत अंबोजगाईच्या विविध बालकलावंतांनी आपला सहभाग नोंदवून आपला कलाविष्कार सादर केला. विविध दिंडया व गितांच्या माध्यमातून व्यसनमुक्ती, पर्यावरणाचे संवर्धन, प्लॉस्टिक मुक्ती, असे विविध संदेश या विद्यार्थ्यांनी दिले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्या संघांना बक्षीस वितरण करण्यात आले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# नगरपंचायतीचा सुधारित विकास आराखडा जनतेवर अन्यायकारक; वडगाव शहर भाजपचा आरोप

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**

वडगाव शहराचा सुधारित विकास आराखडा नगरपंचायत प्रशासनाने प्रसिद्ध केला आहे. मात्र सदर विकास आराखडा हा सामान्य जनतेवर अन्याय कारक असून तो धनदांडण्यासाठी धार्जिना आहे असा आरोप वडगाव शहर भाजपने केला आहे. याबाबत वडगाव नगरपंचायतीचे मुख्य अधिकारी तथा प्रशासन डॉ प्रविण निकम यांना निवेदन देण्यात आले आहे



यावेळी तीर्थक्षेत्र श्री पोटोबा महाराज देवस्थानचे मुख्यविश्वस्त किरण भिलारे,माजी सभापती गुलाबराव म्हाळसकर, सचिव अनंता कुडे, शहराध्यक्ष संभाजी म्हाळसकर यांच्यासह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर निवेदनात म्हटले आहे की वडगाव नगरपंचायत प्रशासनाने नुकताच दुसरा विकास आराखडा प्रसिध्द केला आहे.सदर वडगाव शहराचा विकास आराखडा हा सामान्य जनतेवर अन्याय कारक असून तो धनदांडण्यासाठी धार्जिना आहे, असा आरोप भाजपने केला आहे.

वडगाव मावळ येथील पोटोबा महाराज दत्त, महादेव, मारूती देवस्थानास शासनाने 'क' दर्जा प्राप्त झालेला आहे. सदर देवस्थान हे तालुक्याचे श्रध्दास्थान आहे. भविष्याचा विचार करिता धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमासाठी जागेची आवश्यकता भासणार आहे, तरी पोटोबा देवस्थान यांच्या जमिनीवर तीन - तीन ठिकाणी आरक्षण टाकून सदर जागा बाधित केलेली आहे. आजुबाजुचे धनदांडगे बांधकाम व्यावसायिक यांच्या जागा शाबुत ठेवून देवस्थानच्या जागा मात्र आरक्षण टाकून बाधित केलेल्या आहेत.

सदर विकास आराखड्यामध्ये जैन बांधवाचे श्रध्दास्थान असलेले आणि साधुसंतांचे निवासस्थान असलेले तळ्याजवळील जैन स्थानकावर जाणून बुजुन नव्याने आरक्षण दाखविण्यात आलेले आहे. तरी तमाम जैन बांधवांच्या धार्मिक भावनांचा आदर करून जैन स्थानकावरील आरक्षण तत्काळ हटविण्यात यावे ही मागणी देखील करण्यात आली.

वडगाव बाजारपेठेतील जुना पुणे मुंबई महामार्ग बाजारपेठेमध्ये पूर्व बाजूकडून वडगाव गावठाण हद्दीमध्ये पुढे वडगांव कोर्ट गेट नंबर १ पर्यंत १२ मीटर रूंदीचा असावा तसेच प्रभाग क्रमांक ९ मधील गावठाण हद्दीतील श्री चिंचेचा चिंतामणी गणपती मंदिर जवळील अंतर्गत रस्ता देखील ९ मीटर ऐवजी ६ मीटर करावा ही देखील आमची मागणी असल्याचे या निवेदनात नमूद केलेली आहे.

अनेक नागरिकांनी देखील यांचा आरक्षणाच्या बाबतीत असलेल्या तक्रारी या निमित्ताने नमूद केल्या तसेच नको असलेले आरक्षण तातडीने हटवावे यासाठी निवेदन देखील सादर केले. वरिष्ठ अधिकारी यांना कळवून पुन्हा लेखी हरकती मागवुन आवश्यक बदल पुन्हा करू असे आश्वासन वडगाव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी आणि प्रशासक डॉ.प्रवीण निकम यांनी दिले आहे

# किरण गुजर यांना बालगंधर्व विशेष सन्मान पुरस्कार प्रदान

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती येथील नटराज नाट्य कला मंडळाचे अध्यक्ष किरण गुजर यांना बालगंधर्व रंगमंदीरात 'बालगंधर्व विशेष सन्मान पुरस्कार' देवुन सन्मानित करण्यत आले. बालगंधर्व रंगमंदिराच्या ५७ व्या वर्धापन दिनानिमित्त केंद्रीय नागरीक विमानवाहतुक राज्यमंत्री मुरलीधर मोहळ, अभिनेते प्रशांत दामले यांच्या हस्ते गुजर यांना पुरस्कार देण्यात आला.

बारामतीत नाट्य व सांस्कृति क्षेत्रात गुजर हे गेल्या ४५ वर्षांपासून कार्यरत आहेत. त्यांच्या नाट्य, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्याची दखल घेत पुणे बालगंधर्व परिवाराच्या वतीने या सन्मानासाठी त्यांची निवड करण्यात आली होती. यावेळी राज्यभरातील विविध नाट्य व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर, ज्येष्ठ कलाकार व कलावंत उपस्थित होते. त्यांच्या नटराज नाट्य कला मंडळाने आतापर्यंत ४९ नाटकांची निर्मिती केली असून, १९८१ पासून सलगपणे पारितोषिके मिळवत त्यांनी आपल्या नाट्य संस्थेची वेगळी ओळख निर्माण केली आहे. तसेच गुजर यांनी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष म्हणूनही कार्य केले आहे. १९९५ आणि २०१२ या वर्षांमध्ये बारामती येथे दोन भव्य दिव्य नाट्य संमेलनांचे यशस्वी आयोजनही त्यांनी केले होते.

त्यांच्या कार्याची दखल घेत आजवर नाट्य गौरव, कला गौरव आणि जीवन गौरव असे अनेक पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत. याशिवाय, राज्यभरातील कलाकारांच्या अडचणी सोडविण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला आहे.बारामतीत स्वस्त नाटक योजना, लावणी



महोत्सव, ज्येष्ठ कलावंत गौरव सोहळे, नाट्य व नृत्य प्रशिक्षण शिबिरे, राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा, बारामती गणेश फेस्टिवल आदी उपक्रम त्यांनी राबविले आहेत. या पुरस्काराबाबत किरण गुजर म्हणाले, पुरस्काराच्या निमित्ताने माझ्या कार्याला एक मोठा सन्मान प्राप्त झाला असून, नाट्य व सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांसाठी हे निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे. माझे वडील स्व. बबनराव गुजर यांची ५३ वी पुण्यतिथीच्या दिवशीच बालगंधर्व परिवार यांनी माझा पुरस्कार देऊन सन्मान केला. हा सन्मान माझा नसून सर्व बारामतीकरांचा आहे. ४५ वर्ष अखंड साथ देत असलेल्या नटराज परिवाराचा असल्याचे गुजर म्हणाले.

# धोतराच्या पायघड्या अंथरत काटेवाडीत संत तुकाराम महाराज पालखीचे स्वागत

**काटेवाडी । प्रतिनिधी**

ज्ञानोबा - माउली तुकाराम चा जयघोष आणि टाळ मृदंगाचा गजरात काटेवाडीकर भक्तीरसात न्हाउन निघाले. संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यातील रथाभोवती मेंढ्यांचे पहिले गोल रिंगण काटेवाडी (ता. बारामती) येथे शुक्रवारी (दि. २७) पार पडले. या वेळी पारंपरिक पद्धतीने पालखीच्या स्वागतासाठी धोतराच्या पायघड्या घालण्यात आल्या होत्या.



संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याने शुक्रवारी पहाटे बारामती शहरातुन प्रस्थान ठेवले. मार्गावरील स्वागत स्वीकारत काटेवाडी येथे दुपारी १२ वाजता पालखी सोहळ्याचे आगमन झाले. मुख्य मागार्पासून गावातील दर्शन मंडपात पालखी नेण्यात आली. पालखी रथातून दर्शन मंडपात पालखी नेण्यासाठी परिट समाज बांधवांच्यावतीने धोतराच्या पायघड्या घालण्यात आल्या. बँडपथक, छत्रपती हायस्कूलचे मुलीचे लेझीमपथक यांनी पालखीचे स्वागत केले. हरिनामाच्या गजरात मोठ्या उत्साहात ग्रामस्थांनी पालखी दर्शन मंडपात नेली. पालखी सोहळ्याचे शरयू फौंडेशनच्या अध्यक्षा शर्मिला पवार, सरपंच मंदाकिनी भिसे, उपसंरपच मिलिद काटे, छत्रपतीचे माजी अध्यक्ष प्रशांत काटे, संचालक अनिल काटे, पणन विभागाचे विभागीय उपसरव्यवस्थ्थापक सुभाष घुले, दूध संघाचे संचालक संजय शेळके, जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य पांडूरग कचरे, अजित रमेश काटे, उद्योजक वैभव काटे, श्रीधर घुले, सोसायटीचे अध्यक्ष विजयसिंह काटे आदींनी स्वागत केले.

एकशे चाळीस वर्षाची परंपरा


संत तुकाराम महाराज पालखी सोहळा काटेवाडी गावात दाखल झाल्यावर परीट समाजाकडून धोतराच्या पायघड्या घालून स्वागत करण्याची परंपरा आहे. १४० वर्षांपासून ही प्रथा सुरु आहे. संत गाडगे महाराजांच्या शिकवणुकीतून ही परंपरा सुरु झाल्याचे सांगितले जाते. काटेवाडी गावाच्या वेशीजवळ आल्यानंतर ग्रामस्थ पायघड्या घालून पालखीचे स्वागत करतात.

काटेवाडी येथे पालखीच्या स्वागतासाठी पताका, स्वागत कमानी, लावून परिसराची सजावट केली होती. दर्शन मंडप सभागृह फुलांच्या माळांनी सजविले होते. पालखी सोहळ्या दुपारी विसावल्यानंतर वारकरी भाविकांनी गावात व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या काटेवाडी येथील निवासस्थानी जेवणाचा आस्वाद घेतला. खासदार सुनेत्रा पवार यावेळी उपस्थित होत्या.

# काहीतरी मर्यादा ठेवा, पुण्यात नामांतरावरुन लागलेल्या बॅनवरुन संताप; मेधा कुलकर्णींना रडू कोसळले

**पुणे । प्रतिनिधी**

रेल्वेच्या विभागीय बैठकीत पुणे रेल्वे (पिंपिश) स्टेशनला थोरले बाजीराव पेशवा यांचे नाव देण्याची मागणी केल्यानंतर भाजप नेत्या आणि खासदार मेधा कुलकर्णी यांना सोशल मीडियातून ट्रोल करण्यात आलं. तसेच, विविध संघटनांनी पुढे येऊन पुणे शहरासाठी विविध नावे सूचवली आहेत. त्यामध्ये, महात्मा ज्योतिबा फुले आणि राजमाता जिजाऊ यांचं नाव देण्याची मागणी करण्यात आली होती. तसेच, मेधा कुलकर्णी यांच्या मागणीला विरोध दर्शवत आंदोलनही करण्यात आले. त्यात, पुण्यातील बुधवार पेठेस मस्तानीचं नाव द्या अशा आशयाचे बॅनर झळकले होते. त्यावरुन, बोलताना मेधा कुलकर्णी (चशवहर ज्ञींश्रज्ञरीपळ) भावूक झाल्याचं दिसून आलं. टीका करताना अमर्यादा भाषा वापरल्याचं सांगत त्यांना रडू कोसळलं. पुण्यातील पुणे स्टेशनच्या नावावरून राजकीय वाद





पाहायला मिळाला. पुणे रेल्वे स्टेशनला थोरले बाजीराव यांच्या नावाने दिले पाहिजे अशी मागणी भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांनी केल्यावर अनेकांनी यात उडी घेतली आहे. पुणे रेल्वे स्थानकाला राजमाता जिजाऊ यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी इतिहास अभ्यासक श्रीमंत कोकाटे यांनी केली होती. तर, पुणे शहरात 'पोस्टर वॉर' सुरू झाल्याचं चित्र देखील पाहायला मिळाले. खासदार मेधा कुलकर्णी यांच्या या मागणीला उत्तर म्हणून शहरात ठिकठिकाणी खोचक बॅनर झळकले. या बॅनरमध्ये 'कोथरूडच्या बाई, नामांतराची एवढी खुमखुमी असेल तर बुधवार पेठेचं नाव 'मस्तानी पेठ' करा!' असा मजकूर होता. हे बॅनर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटातर्फे लावण्यात आले होते. आता, या बॅनरवर पहिल्यांदाच मेधा कुलकर्णी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. तसेच, बॅनरवरील मजकुराबद्दल बोलताना त्यांनी तीव्र शब्दात संताप व्यक्त केला.

पुणे स्टेशनला सध्या नावच नाही. त्यामुळे, आता आपण सगळे नाव देऊ शकतो. बाजीराव पेशवे भूषणवाह नाव आहे, ते नाव द्यावे, असे मत मी मांडले. कोणीही आपलं मत मांडू शकतो, टीका होऊ शकते. पण, मस्तानीचं नाव बुधवार पेठेला द्या म्हणता? असे म्हणत मेधा कुलकर्णी भावूक झाल्या होत्या. आम्ही नाव द्या म्हटले पण निर्णय घेणारे वेगळे लोक आहेत. आम्ही अर्ज केला आहे, आमच्यावर टीका होऊ शकते, पण त्याला लेव्हल ठेवा, अशा शब्दात खासदार मेधा कुलकर्णी यांनी पुणे रेल्वे स्टेशनला बाजीराव पेशवेंचं नाव देण्याची मागणी केल्यानंतर होणाऱ्या टीकांवरुन संतापही व्यक्त केला. नावाबाबतची प्रक्रिया होईल, मी जगभरात साडी नेसून गेले, माझे पोस्टर लावले मला खूप वाईट वाटले, अश्लील लावले, काळ सोकावू नये म्हणून तशा लोकांना शिक्षा झाली पाहिजे. टीकेला मर्यादा तर ठेवा, महिला वर्ग म्हणून मी बोलले पाहिजे, असे म्हणताना खासदारांना रडू कोसळलंय.

# अतिरिक्त आयुक्तांनी खराडी-शिवणे रस्त्याची केली पहाणी

**पुणे । प्रतिनिधी**

वडगावशेरीतील वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली असून, नगर रस्त्यावर तासंतास वाहतूक कोंडीत अडकून पडणाऱ्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी महापालिका प्रशासन सरसावले आहे. विशेषतः गेल्या तेरा वर्षांपासून रखडलेल्या खराडी-शिवणे नदीपात्रातील रस्त्याच्या कामाची पाहणी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी महापालिकेच्या पथ विभागाच्या अधिकाऱ्यांसह केली. यावेळी या परिसरातील सामाजिक कार्यकर्तेही यावेळी उपस्थित होते.



खराडी-शिवणे रस्त्याचे काम तब्बल १३ वर्षांपासून रखडले असून, आतापर्यंत केवळ ५० टक्के भूसंपादन पूर्ण झाले आहे. उर्वरित ५० टक्के भूसंपादनासाठी जागा मालकांना नोटिसा पाठविण्यात आल्या आहेत. या रस्त्याचा तिसरा टप्पा म्हणजे खराडी ते संगमवाडी हा ११.५ किमीचा असून, त्यातील सुमारे ६ किमी परिसरातील भूसंपादन पूर्ण झाले आहे.

खराडी गाव ते मुंढवा पूलदरम्यानचा रस्ता पूर्ण होऊन सध्या वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. मात्र संगमवाडी ते गुंजन चौक (४ किमी), गुंजन चौकातील ५०० मीटर आणि वडगावशेरी-खराडी दरम्यानच्या १ किमी रस्त्यासाठीचे भूसंपादन अद्याप बाकी आहे. त्यामुळे नदीपात्रात प्रस्तावित रस्ता पूर्ण झाल्यास या मार्गावरचा ताण कमी होणार आहे. त्यामुळे या कामाला प्राधान्य देत प्रशासनाने भूसंपादन प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे नियोजन हाती घेतले आहे.

# खडक पोलीस ठाण्याची धाडसत्र कारवाई; गावठी हातभट्टी दारुचा साठा उध्वस्त, आरोपी अटकेत

**पुणे । प्रतिनिधी**

खडक पोलीस ठाण्याच्या पथकाने लक्ष्मी माता मंदिराजवळ काशीवाडी परिसरात मोठी कारवाई करत गावठी हातभट्टीची दारू बनवणाऱ्या अड्ड्यावर छापा टाकून मोठ्या प्रमाणात दारू व रसायनसाठा जप्त केला आहे. कारवाईत राधा अनिल सोनवणे ( ५० ) या महिलेला अटक करण्यात आली असून तिच्याकडून सुमारे २४,००० रोख व दारूचे साठे जप्त करण्यात आले आहेत. पोलीस शिपाई आशिष चव्हाण यांनी दाखल केलेल्या फिर्यादीनुसार, दिनांक २५ जून २०२५ रोजी सकाळी मिळालेल्या खबरीनुसार सदर परिसरात आरोग्यास घातक रसायने मिसळून गावठी हातभट्टीची दारू तयार केली जात असल्याचे समजले. यासंदर्भात सहायक पोलीस निरीक्षक ऋतुजा जाधव व पोलीस उपनिरीक्षक कावळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक स्थापन करून छापा टाकण्यात आला. तपासादरम्यान आरोपीने आणखी एक रूम दाखविली, जिथे विक्रीसाठी ग्राहकांची उपस्थिती होती. सदर रूम्स संतोष शिंदे व आशा तलवारे यांच्या मालकीच्या असून त्यांनी त्या भाड्याने दिल्याचे उघड झाले आहे.

संपूर्ण कारवाई पंचासमक्ष पार पाडण्यात आली असून गावठी दारूचे उर्वरित साठे व साहित्य जागेवरच नष्ट करण्यात आले. रासायनिक विश्लेषणासाठी एक नमुना सीलबंद करून प्रयोगशाळेत पाठविण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ कलम १२३, २७४, २७५ व महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अंतर्गत कलम ६५(ई), ब्र. ६८, ८६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# धनकवडी-सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयात राष्ट्रवादी आणि शिवसेना शिंदे गटात वादावादी

**कात्रज । प्रतिनिधी**

धनकवडी-सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयात आयोजित मोहल्ला कमिटीच्या बैठकीदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष सुभाष जगताप आणि शिवसेना (शिंदे गट) चे पदाधिकारी उद्धव कांबळे यांच्यात जोरदार वादावादी झाली. नागरिकांच्या समस्या ऐकण्यासाठी बोलावलेल्या या बैठकीत राजकीय कुरघोडी आणि दोन सत्ताधारी पक्षाच्या पदाधिकाऱ्यात वाद झाल्याने हा चर्चेचा विषय बनल्याचे पाहायला मिळाले.

बैठकीदरम्यान स्थानिक पायाभूत सुविधा, कचरा व्यवस्थापन आणि अनधिकृत बांधकामासंदर्भात चर्चा सुरू असताना पद्मावती परिसरातील एका सोसायटीच्या महिला पदाधिकाऱ्याने प्रश्न उपस्थित केला की, सोसायटीच्या बाजूला झोपडपट्टी असून अवैध धंदे चालतात ते बंद करण्यात यावेत. यामध्ये शिंदे गटाचे पदाधिकारी उद्धव कांबळे यांनी हस्तक्षेप केला असता सुभाष जगताप यांनी बोलण्यास मज्जाव केला. कांबळे यांना काही काळानंतर बोलण्याची संधी मिळाली तेंव्हा





ही जागा जगताप यांचीच होती अशा प्रकारचा युक्तिवाद त्यांनी केल्यावर हा वाद उफाळला आणि शाब्दिक चकमक उडाली. त्यावर पोलिसांनी हस्तक्षेप करत वाद मिटवला.

परिस्थिती तणावपूर्ण होऊ नये म्हणून उपस्थित महापालिका अधिकाऱ्यांनी मध्यस्थी करत बैठक शांततेत पुढे नेण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे स्थानिक पातळीवर पुन्हा एकदा राजकीय धुसफुशीला तोंड फुटले असून, आगामी पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अशा घडामोडींना विशेष महत्त्व प्राप्त होत आहे.

# बांधावरून वादः सख्ख्या भावांचा चुलत भावावर जीवघेणा हल्ला

पाटस । प्रतिनिधी

दौंड तालुक्यातील बिरोबावाडी येथे शेतीच्या बांधावरून झालेल्या वादातून सख्ख्या भावांनी चुलत भाऊ कैलास हगारे याच्यावर जीवघेणा हल्ला करीत हात व पाय तोडल्याची धक्कादायक घटना घडली. गुरुवारी (दि. २६) दुपारी दीडच्या सुमारास ही घटना घडली. याप्रकरणी यवत पोलिसांनी प्रवीण व नंदा हगारे या दोघा भावांना अटक केली आहे, अशी माहिती सहायक पोलिस उपनिरीक्षक प्रवीण संपांगे यांनी दिली.

जखमी कैलास हगारे यांची मुलगी अनुष्का हिने पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार, पूर्वीपासून हगारे कुटुंबीयांमध्ये शेतीच्या बांधावरून वाद सुरू होता. याच वादातून गुरुवारी सोमनाथ, प्रवीण, गणेश, नंदा, प्रतीक्षा व प्रांजल (सर्व रा. बिरोबावाडी, ता. दौंड) या सहा जणांनी मिळून कैलास यांच्यावर कोयता, तलवार, कुऱ्हाड यासारख्या धारदार हत्यारांनी हल्ला चढविला. या हल्ल्यात कैलास यांचा उजवा हात मनगटापासून, तर डावा पाय नडगीपासून तोडण्यात आला.

या गंभीरप्रकरणी संबंधित आरोपींवर यवत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, प्रवीण आणि नंदा यांना अटक करण्यात आली असून, उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. घटनेचा तपास सहायक पोलिस उपनिरीक्षक संपांगे करीत आहेत.दरम्यान, यापूर्वी सोमनाथ हगारे, प्रवीण हगारे आणि गणेश हगारे यांनी जखमी कैलास हगारे यांना मारहाण करून त्यांचा डावा पाय गंभीर जखमी केला होता. त्याबाबत यवत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

# राज्यातील ५१ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या; तेजस्वी सातपुतेंना नवी जबाबदारी, पुण्यात ३ नवे आयपीएस

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील महायुती सरकारकडून गेल्या काही महिन्यात आएएस आणि आयपीएस (खझड) अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा धडाका लावण्यात आल्याचं पाहायला मिळत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सातत्याने बदल्या होत असून आता तब्बल ५१ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये, पुणे, मुंबई (चींलरळ), नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, ठाणे, धुळे, हिंगोली, जळगाव येथील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. त्यामध्ये, पुण्यातील शस्त्र निरीक्षक शाखा पोलीस अधीक्षकपदी असलेल्या तेजस्वी सातपुते यांची समादेशकपदी बदली करण्यात आली आहे. पुणे राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ पदावर त्यांना नियुक्ती देण्यात आली आहे. तर, महेंद्र पंडित यांची स्तंभ २ मधून स्तंभ ३



मध्ये नमूद पदावर बदली करण्यात आली आहे. त्यानुसार, महेंद्र पंडित यांना बृह्मुंबई पोलीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्यभरातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून तब्बल ८१ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून ५१ खझड अधिकार्यांना काहींना प्रमोशन तर काहींचे डिमोशन करुन बदली करण्यात आली आहे. पुण्यातील परिमंडळ दोनच्या पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील यांची पोलीस प्रशिक्षण केंद्र खंडाळा येथे बदली करण्यात आली असून वाहतूक पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांची देखील बदली करण्यात आली आहे. सरकारच्या नव्या बदली आदेशान्वये पुण्यामध्ये तीन नव्या आयपीएस अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. दरम्यान, राज्यात गेल्या १५ दिवसांपूर्वी ८ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्यानंतर गेल्या आठवड्यात पुन्हा चार आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्याचे आदेश जारी करण्यात आले होते. त्यामध्ये मुंबई मेट्रो क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन यांची वर्ध्याच्या जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी बदली करण्यात आली आहे. तर अमरावतीचे आयुक्त सचिन कळंत्रे (डरलहळप घरश्ररपींश) यांची बदली पुण्यातील यशदाचे उपसंचालकपदी करण्यात आली. त्यानंतर, आता ५१ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्याआहेत.

कोल्हापूरचे पोलीस अधीक्षक तुषार पाटील यांची मुंबईत पोलीस उपायुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, विजय पवार, सुनिल लोखंडे, नम्रता पाटील आणि स्मिता पाटील यांची मुंबईतील पोलीस उपायुक्त पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. म्हणजेच मुंबईतील पोलीस उपायुक्त पदावर ५ आयपीएस अधिकाऱ्यांची पदोन्नतीवर नेमणूक करण्यात आली आहे.